cmyk

## संपादकीय

### सुसंस्कृत, अभ्यासू नेता हरपला !

काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय गृहमंत्री, लोकसभेचे माजी अध्यक्ष, पंजाबचे माजी राज्यपाल, भारतीय राजकारणातील सुसंस्कृत, निष्कलंक, अभ्यासू आणि संसदीय परंपरा जपणारे नेते, लातूरचे सुपुत्र शिवराज पाटील चाकूरकर यांचे शुक्रवारी सकाळी ६.३० वाजता देवघर या त्यांच्या निवासस्थानी अल्पशा आजाराने निधन झाले.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२२७ | रविवार दि.१४ डिसेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### हायकोर्टाच्या कार्यपद्धतीवर सुप्रीम कोर्टाची नाराजी

नवी दिल्लीः सर्वोच्च न्यायालयाने प्रकरणांची सुनावणी आणि लिस्टिंग (सूचीबद्ध करणे) यासाठी अवलंबल्या जाणाऱ्या नियमांवर मद्रास उच्च न्यायालयाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. करूर येथील चेंगराचेंगरीच्या घटनेनंतर उच्च न्यायालयाच्या भूमिकेवर न्यायालयाने आपली चौकशी तीव्र केली आहे आणि म्हटले आहे की, ज्या प्रकारे उच्च न्यायालयाने या दुर्घटनेशी संबंधित प्रकरणे हाताळली, त्यात काहीतरी गडबड आहे. या घटनेत अभिनेत्यातून राजकारणी बनलेल्या विजय यांच्या तमिळगा वेत्री कळघम पक्षाच्या राजकीय कार्यक्रमादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ४१ जणांचा मृत्यू झाला होता. न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी आणि न्यायमूर्ती विजय बिश्नोई यांच्या खंडपीठाने मद्रास उच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रार जनरल यांनी सादर केलेल्या अहवालाचे परीक्षण केल्यानंतर ही टिप्पणी केली. हा अहवाल सर्वोच्च न्यायालयाने ऑक्टोबरमध्ये मागवला होता.

### सन्मान योजनेपासून साडेसहा लाख शेतकरी वंचित

नागपूर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या कार्यकाळात जाहीर झालेल्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत पात्र ठरलेले राज्यातील तब्बल ६ लाख ५६ हजार शेतकरी योजनेच्या लाभापासून अद्याप वंचित असल्याची कबुली सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी विधानसभेत लेखी प्रश्नाच्या उत्तरात दिली आहे. या शेतकऱ्यांना सन्मान योजनेचा लाभ देण्यासाठी ५ हजार ९७५ कोटी ५१ लाख रुपयांच्या निधीची आवश्यकता असल्याचे उत्तरात नमूद करण्यात आले आहे. शवसेना ठाकरे गटाचे गुहागरचे आमदार भास्कर जाधव यांनी शेतकरी सन्मान योजनेबाबत प्रश्न विचारला होता. या प्रश्नाच्या लेखी उत्तरात पाटील यांनी शेतकरी सन्मान योजना २०१७ अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना लाभ देण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने २०२२ मध्ये दिले होते तरीही ६ लाख ५६ हजार शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळाला नसल्याचे पाटील यांनी उत्तरात मान्य केले आहे.

### लहान मुले पळवून नेण्यावर चर्चा करा – राज ठाकरे

मुंबई : नागपूर येथे विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक पत्र लिहिले आहे. राज्यात लहान मुले पळवून नेणारी टोळी कार्यरत आहे, तसेच तरुण मुली देखील गायब होत आहेत, हा विषय अत्यंत गंभीर असून, यावर विधिमंडळात चर्चा व्हावी अशी मागणी राज ठाकरे यांनी त्यांच्या सोशल मीडिया हँडलवरून पोस्ट करत केली आहे. महाराष्ट्रात लहान मुले पळवण्याचे, ती बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढत आहे. लहान मुलांना पळवून, नंतर त्यांना कामाला जुंपणाऱ्या, त्यांना भीक मागायला लावणाऱ्या आंतरराज्य टोळ्या तयार झाल्या आहेत. आणि या टोळ्या सर्रास लहान मुले पळवत आहेत आणि यावर सरकार नक्की काय कारवाई करत आहे हेच समजत नाही, असे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

### भारतासाठी गुडन्यूज; टॅरिफ वॉर संपण्याची शक्यता !

नवी दिल्लीः अमेरिका आणि भारत यांच्यातील व्यापारावर लादण्यात आलेल्या ५०% पर्यंतच्या उच्च आयात शुल्कावर (टॅरिफ) आता थेट अमेरिकेच्या संसदेतच विरोध सुरू झाला आहे. या विरोधात अमेरिकेतील डेमोक्रॅटिक पक्षाचे तीन हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह सरसारवले असून, त्यांनी संयुक्त ठराव सादर केला आहे. यामुळे दोन्ही देशांतील व्यापार तणाव कमी होण्याची चिन्हे दिसत आहेत. सध्या अमेरिकेने भारतीय वस्तूंवर ५०% पर्यंत आयात शुल्क लावले आहे. यात रशियाकडून तेल खरेदी केल्यामुळे लावलेल्या अतिरिक्त २५% दंडात्मक शुल्काचा समावेश आहे. अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहातील तीन खासदारांनी १३ डिसेंबर २०२५ रोजी डोनाल्ड ट्रम्प यांनी लागू केलेली ५०% टॅरिफ अधिकृत करणारी राष्ट्रीय आणीबाणी घोषणा संपुष्टात आणण्यासाठी ठराव सादर केला आहे.

### इंडिगोचे चार विमान निरीक्षक बडतर्फ

नवी दिल्लीः भारताची हवाई वाहतूक नियामक संस्था, नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) संकटात सापडलेल्या इंडिगोच्या सुरक्षा आणि कार्यकारी अनुपालनावर देखरेख करणाऱ्या चार विमान निरीक्षकांना बडतर्फ केले आहे. एअरलाईनच्या तपासणी आणि देखरेखीमध्ये निष्काळजीपणा केल्यामुळे ही कारवाई करण्यात आली. कडक सुरक्षा नियमांचे नियोजन करण्यात अपयशी ठरल्याने इंडिगोने या महिन्यात हजारो उड्डाणे रद्द केली, ज्यामुळे देशभरात हजारो प्रवासी अडकून पडले. दि. ५ डिसेंबर रोजी रद्द झालेल्या उड्डाणांची संख्या सर्वाधिक होती आणि त्यानंतर ती कमी झाली आहे. एअरलाईनने मंगळवारी सांगितले की, तिचे कामकाज स्थिर झाले आहे आणि सामान्य पातळीवर परत आले आहे.

# शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे पाप महायुती सरकारचे

## विजय वडेट्टीवारांचा सरकारवर हल्लाबोल

नागपूर । प्रतिनिधी

**राज्यातील शेतकऱ्याच्या आत्महत्यांचे पाप महायुती सरकारचे आहे, अशी टीका अंतिम आठवड्याच्या प्रस्तावावर चर्चा सुरू करताना काँग्रेसचे गटनेते विजय वडेट्टीवार यांनी शनिवारी (दि.१३) केली.**

रविवारी (दि. १४) नागपुरात सुरू असलेल्या विधिमंडळ हिवाळी अधिवेशनाचे सूप वाजणार आहे. ८ डिसेंबरपासून सुरू झालेल्या या अधिवेशनावर नगर पालिका निवडणूक निकाल न आल्याने अनिश्चिततेचे तर आचारसंहितेचे सावट आहे. सत्तापक्ष आणि विरोधकांच्या प्रस्तावावरील चर्चेला उद्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकार उत्तर देणार आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील भ्रष्टाचार आणि विविध गंभीर समस्यांवरून सत्ताधारी पक्षावर वडेट्टीवार, सुनील प्रभू यांनी जोरदार टीका केली. शेतकरी आत्महत्या, कृषी क्षेत्रातील निधीचा अपव्यय, ढासळलेली कायदा आणि सुव्यवस्था, महिला व बालकांवरील वाढते अत्याचार तसेच भ्रष्टाचाराच्या मुद्द्यांवरून



विरोधकांनी सरकारवर हल्लाबोल केला. राज्यात दररोज ८ शेतकरी आत्महत्या करीत आहेत. अतिवृष्टीने राज्यातील २८ जिल्ह्यांना फटका बसला. सरकारने ३१ हजार कोटींच्या पॅकेजची घोषणा केली.पण हे पॅकेज कागदावर राहिले. कोरडवाहू शेतकऱ्यांना प्रती हेक्टर १८,५०० रुपये मदतीचे गाजर दाखवले, पण प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या पदरात फक्त ८,५०० रुपये मिळाले. कृषी विभागाला ६,००० कोटी रुपयांची गरज असताना सरकारने शेतकऱ्यांसाठी केवळ ६१६ कोटी रुपये दिले. चार महिन्यांपूर्वी कृषी समृद्धी योजनेची मोठी घोषणा केली, पण आजपर्यंत या योजनेसाठी एका पैशाची तरतूद केलेली नाही. यामुळे विदर्भात होणाऱ्या अधिवेशनात शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडणार नाही. आर्थिक वर्ष संपायला अडीच महिने उरले असताना कृषीसाठी अर्थसंकल्पीय तरतुदीच्या केवळ ३४ टक्के निधी खर्च झाला आहे. आज शेतकऱ्यांचे ▶▶ पान २ वर

# शिक्षकांच्या रिक्त जागांवरून विधानसभेत रणकंदन !

नागपूर । प्रतिनिधी

**जिल्हा परिषद शाळांमधील बदली प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यांतर्गत ६६ हजार ५२० शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. कमी विद्यार्थी असणाऱ्या जिल्हा परिषदेच्या शाळा बंद होणार नाहीत, असे आश्वासन ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत दिले. ऑक्टोबरपर्यंत बदली प्रक्रिया राबविली जाते. त्यामुळे शैक्षणिक सत्रादरम्यान शिक्षकांच्या अनुपस्थितीमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडचण येते. ही प्रक्रिया जूनपर्यंत पूर्ण करण्यात यावी, अशी मागणी विधानसभेत करण्यात आली.**



राज्यातील शिक्षकांच्या रिक्त पदांबाबत विरोधाभास असल्याचे दिसून आले. मंत्र्यांनी एकूण स्वीकृत पदांची संख्या एक लाख नव्वद हजार नऊशे तीन सांगितली. त्यापैकी एक लाख छप्पन्न हजार सहाशे चौदा कार्यरत आहेत व सुमारे पंधरा हजार एकशे अठ्ठावन्न पदे रिक्त आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात ४७२ पदे रिक्त आहेत. मागील माहितीनुसार रिक्त पदांची संख्या ३७ हजार होती आणि आज शुक्रवारी मंत्र्यांनी पंधरा हजार एकशे अठ्ठावन्न रिक्त पदे असल्याचे सभागृहात सांगितले. जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षणाचा खेळखंडोबा झाला आहे, त्यामुळे सरकारने या रिक्त जागा लवकरात लवकर भराव्यात अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत केली.विधानसभेत प्रश्नोत्तराच्या काळात राज्यातील जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांच्या बदलीबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला. एकीकडे शिक्षकांची पदे रिक्त आहेत. दुसरीकडे राज्यात पन्नास हजार जिल्हा परिषदेच्या शाळा बंद करण्याच्या बातम्या येतात. ▶▶ पान २ वर

# २१ डिसेंबरपर्यंत मिळणार 'लाडकी'चा हप्ता?



मुंबई । प्रतिनिधी

**नोव्हेंबर महिना उलटला आता डिसेंबरचा अर्धा महिना होत आला तरीही अजून लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थ्यांना एकही हप्ता मिळाला नाही. लाभार्थी महिला या नोव्हेंबर आणि डिसेंबरच्या हप्त्याची वाट पाहत आहेत. हे दोन्ही हप्ते एकत्र येणार असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, येत्या ७ दिवसात महिलांच्या खात्यात ३००० रुपये येऊ शकतात.**

### केवायसीसाठी ३१ डिसेंबर शेवटची तारीख

लाडकी बहीण योजनेत केवायसी करण्यासाठी शेवटचे १७ दिवस उरले आहे. लाडकी बहीण योजनेत केवायसी करण्याची शेवटची तारीख ३१ डिसेंबर आहे. त्यामुळे त्याआधी सर्व महिलांना केवायसी करायची आहे. जर तुम्ही केवायसी केली नाही तर तुम्हाला योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे महिलांनी लवकरात लवकर हे काम करावे, असे आवाहन आदिती तटकरेंनी केले आहे.

लाडकी बहीण योजनेत लाभार्थ्यांचा दोन महिन्यांचा निधी नोव्हेंबर–डिसेंबरचे पैसे एकत्र येऊ शकतात. २१ डिसेंबरआधी पैसे येण्याची शक्यता आहे. २० डिसेंबर रोजी २० नगरपरिषद निवडणुकांसाठी ▶▶ पान २ वर

# बालकांच्या टाळूवरचे लोणी खाणाऱ्यांची चौकशी करा!



## कोट्यावधींचा खर्च करुन नेमके कुणाचे पोषण? रोहित पवारांचा सरकारवर हल्लाबोल

नागपूर । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी बालमृत्यू च्या मुद्यावरुन राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. कुपोषणामुळेच बालमृत्यू होत असल्याचे रोहित पवार यांनी म्हटलें आहे. कोट्यावधी रुपये खर्च होऊनही यातून नेमके कुणाचे पोषण होत आहे? असा सवाल करत रोहित पवारांनी राज्य सरकारवर हल्लाबोल केला आहे.**

राज्यात गेल्या तीन वर्षांत तब्बल १४.५ हजार बालमृत्यू हे केवळ कुपोषणामुळे झाले आहेत. महाराष्ट्रासाठी ही अत्यंत लज्जास्पद बाब आहे. कुपोषण निर्मुलनावर राज्य सरकारचे दरवर्षी कोट्यावधी रुपये खर्च होऊनही यातून काहीच निष्पन्न होताना दिसत नाही, असा गंभीर प्रश्न रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे. सरकारने याची संपूर्ण वस्तूनिष्ठ चौकशी करून बालकांच्या टाळूवरचे लोणी वरपणाऱ्यांचे खरे चेहरे पुढे आणावेत, अशी मागणी देखील रोहित पवार यांनी कली आहे. यापूर्वी अनेक अधिवेशनात कुपोषणामुळे होणाऱ्या मृत्यूचा विषय मांडला, पण केवळ छापील उत्तर देण्यापलीकडे सरकारने काहीही केले नाही. आतातरी सरकारने संवेदना दाखवाव्यात ▶▶ पान २ वर

# भत्ते रखडले:अंगणवाडी सेविका आक्रमक



नागपूर । प्रतिनिधी

राज्यातील १ कोटीपेक्षा जास्त लाडक्या बहिणींना दरमहा १५०० रुपये देणाऱ्या सरकारने त्याच बहिणींसाठी काम करणाऱ्या राज्यातील काही लाख अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे लाखो रुपयांचे भत्ते मात्र थकवले आहेत. लाडकी बहीण योजनेचे अर्ज जमा करण्यासाठीचे मानधनही अनेक जिल्ह्यांमध्ये प्रलंबित ठेवण्यात आले असल्याने अंगणवाडी सेविकांनी लवकरात लवकर रखडलेला निधी मिळावा यासाठी सरकारकडे मागणी केली आहे.

राज्यातील महत्त्वाच्या व लोकप्रिय अंगणवाडी योजनेत लाखो महिला सेविका व मदतनीस म्हणून काम करतात. सेविकेला ▶▶ पान २ वर

# मेस्सीच्या कार्यक्रमात प्रचंड गोंधळ; आयोजकाला अटक, सरकारकडून समिती

कोलकाता । वृत्तसंस्था

कोलकात्यात अर्जेंटिनाचा स्टार फुटबॉलपटू लिओनल मेस्सी याच्या कार्यक्रमादरम्यान मोठा गोंधळ झाल्याच्या घटनेनंतर पश्चिम बंगालचे डीजीपी राजीव कुमार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी सांगितले की, कार्यक्रमाचे मुख्य आयोजक सताद्रु दत्ता यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याच्या चौकशीसाठी सरकारकडून समिती स्थापन करण्यात आली आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना डीजीपी राजीव कुमार म्हणाले की, कार्यक्रमाच्या आयोजनात आयोजकांकडून मोठ्या प्रमाणात गैरव्यवस्थापन झाले. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी राज्य सरकारने आधीच एक समिती स्थापन केली असून, ही समिती सर्व बाबींची बारकाईने तपासणी करत आहे. या घटनेबाबत पश्चिम बंगालचे अतिरिक्त पोलिस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) जावेद शमीम यांनी सांगितले की, आता परिस्थिती ▶▶ पान २ वर

# सारथी–बार्टीकडून मिळणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीला कात्री लागणार!

## पी.एचडी.प्रवेशावर मर्यादा आणण्याची अजित पवारांची घोषणा

नागपूर । प्रतिनिधी

हिवाळी अधिवेशनाच्या सहाव्या दिवशी म्हणजेच शनिवारी माजी मंत्री तथा काँग्रेसचे आमदार डॉ. नितिन राऊत यांनी राज्य शासनाच्या बार्टी, सारथी आणि महाज्योती संस्थांमधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती विहीत वेळेमध्ये मिळण्याबाबतचा प्रश्न उपस्थित केला. यावेळी विधानसभेत उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी उत्तर दिले. यावेळी त्यांनी सारथी आणि बार्टीच्या पी.एचडी. करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर आता मर्यादा घालणार असल्याची घोषणा सभागृहात केली. ज्यामुळे आता काही विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीला कात्री लागण्याची शक्यता आहे.

अजित पवार म्हणाले, समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल–वंचित घटकांतील, परदेशात शिक्षण घेण्याची क्षमता नसलेल्या ▶▶ पान २ वर

# बकऱ्या जंगलात सोडा, वनमंत्र्यांच्या सूचनेची अजित पवारांनी उडवली खिल्ली

नागपूर । प्रतिनिधी

**जर बिबट्याच्या हल्ल्यात चार लोक मारले गेले, तर राज्याला १ कोटी रुपये भरपाई म्हणून द्यावे लागतात. म्हणून मी अधिकाऱ्यांना सांगितले की, मृत्यू झाल्यानंतर भरपाई देण्याऐवजी, १ कोटी रुपयांच्या बकऱ्या जंगलात सोडा, जेणेकरून बिबटे मानवी वस्तीत येणार नाहीत, असे वनमंत्री गणेश नाईक यांनी बिबट्यांना भक्ष्याच्या शोधात मानवी वस्त्यांमध्ये येण्यापासून रोखण्यासाठी वन अधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत. यावरती राज्य वनमंत्र्यांच्या सूचनेची उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी खिल्ली उडवली. ही कल्पना वनविभागाकडूनच आली असावी. बिबट्यांऐवजी, भक्ष्य म्हणून सोडलेल्या बकऱ्यांवर गावातील लोकही ताव मारतील, असे पवार म्हणाले.**





बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांच्या घटनांना तोंड देण्यासाठी सरकारच्या योजनांबद्दल विचारले असता, पवार म्हणाले, बिबट्यांची पैदास होत आहे आणि ते काही विशिष्ट भागांमध्ये, विशेषतः ऊस पिकवणाऱ्या प्रदेशात राहत आहेत. सरकारने वांत्रा प्राणीसंग्रहालयाशीही चौकशी केली होती. त्यांनी सांगितले की ते केवळ ५० बिबट्यांनाच ठेवू शकतात. मी ऐकले आहे की महाराष्ट्रात जवळपास २ हतार बिबटे आहेत. अशा परिस्थितीत, आपल्याला इतर उपायांचा विचार करणे आवश्यक आहे. नसबंदी हा एक प्रभावी पर्याय असू शकतो. परंतु त्याचा परिणाम केवळ दीर्घ कालावधीनंतरच दिसून येईल, कारण नसबंदीनंतरही बिबटे अन्नासाठी शिकार करतच राहतील. ▶▶ पान २ वर

## एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री होतील–ॲड. आंबेडकर

पुणे । प्रतिनिधी

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या विषयात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना खिशात घातले आहे. राज्यातील नेतृत्व बदलाची ही नांदी असून पुढील महिना दोन महिन्यात शिंदे पुन्हा मुख्यमंत्री होतील असा खळबळजनक दावा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे.**

आगामी महापालिका निवडणुकांच्या निमित्ताने आढावा घेण्यासाठी वंचित बहुजन आघाडीची बैठक पत्रकार भवन येथे पार पडली. त्यावेळी आंबेडकर यांनी माध्यमांशी संवाद साधला. भाजपचे नेते स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक स्वबळावर लढण्याची भूमिका घेत होते. पण आता एकनाथ शिंदे व शहा यांची भेट झाल्यानंतर महायुती एकत्र निवडणुका लढवेल असे सांगत आहे. शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१३ डिसेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५८.०० क्विंटल | २,३६१ | ३,१०१ | २,७२४ |
| ज्वारी/हायब्रिड: १७.०० क्विंटल | १,८०० | ३,१०० | २,५८२ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | १,६२६ | १,६२६ | १,६२६ |
| तूर : ३.५० क्विंटल | ६,४०० | ६,४०० | ६,४०० |
| उडीद :१९.५० क्विंटल | ४,५०० | ५,५७३ | ४,९५४ |
| बाजरी: २६.५० क्विंटल | २,६०० | ३,२१० | २,९२२ |
| मुग: १.५० क्विंटल | ५,८५० | ५,८५० | ५,८५० |
| सोयाबीन: १५.०० क्विंटल | ४,४०० | ४,४०० | ४,४०० |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |

cmyk

## अग्रलेख

# सुसंस्कृत, अभ्यासू नेता हरपला !

काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय गृहमंत्री, लोकसभेचे माजी अध्यक्ष, पंजाबचे माजी राज्यपाल, भारतीय राजकारणातील सुसंस्कृत, निष्कलंक, अभ्यासू आणि संसदीय परंपरा जपणारे नेते, लातूरचे सुपुत्र शिवराज पाटील चाकूरकर यांचे शुक्रवारी सकाळी ६.३० वाजता देवघर या त्यांच्या निवासस्थानी अल्पशा आजाराने निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. जिल्ह्यातील चाकूर गावातून सुरू झालेला त्यांचा सामाजिक, राजकीय क्षेत्रातील प्रवास राजधानी दिल्लीपर्यंत पोहोचला आणि ६ दशकांहून अधिक काळ जनसेवेत राहून त्यांनी भारतीय राजकारणात आपली एक वेगळी छाप सोडली. या महान नेतृत्वाची आज प्राणज्योत मालवली आणि एक सुसंस्कृत, अभ्यासू नेता हरपला.

शिवराज पाटील चाकूरकर यांनी तत्कालीन लातूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष ते देशाच्या लोकसभेचे सभापती, केंद्रीय गृहमंत्री, पंजाबचे राज्यपाल यासह राज्य आणि केंद्रीय राजकारणात विविध मंत्रिपदासह विविध पदे भूषविलेली आहेत. त्यांच्या निधनाचे वृत्त कळताच लातूर शहर, जिल्हा व राज्यातून विविध पक्ष, संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी लातूर येथील 'देवघर' या निवासस्थानी जाऊन त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. यासोबतच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री पंकजा मुंडे, माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, काशीचे जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर महास्वामीजी, हभप गहिनीनाथ महाराज, माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, माजी खा. रुपाताई पाटील, माजी खा. सुनिल गायकवाड, काँग्रेस जिल्हाध्यक्ष अभय साळुंके आदींनी शिवराज पाटील चाकूरकर यांना पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली अर्पण केली. माजी केंद्रीयमंत्री शिवराज पाटील चाकूरकर हे आयुष्यभर काँग्रेस पक्षात सक्रीय राहिले. मागच्या काही वर्षांपासून त्यांनी भारतीय राजकारणातून काही अंशी निवृत्ती घेतली होती. मात्र, सातत्याने राजकीय नेत्यांशी त्यांच्या गाठीभेटी, संवाद सुरूच होता.

भारतीय राजकारणातील एक महत्त्वाचे आणि अनुभवी व्यक्तिमत्त्व म्हणून शिवराज पाटील चाकूरकर यांची ओळख होती. १२ ऑक्टोबर १९३५ रोजी लातूर जिल्ह्यातील चाकूर येथे जन्मलेले शिवराज पाटील चाकूरकर यांनी उस्मानिया विद्यापीठातून विज्ञान विषयात पदवी प्राप्त केली. त्यानंतर मुंबई विद्यापीठातून ते कायद्याचे पदवीधर बनले. १९६० नंतर त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच लातूर नगर परिषदेतून सार्वजनिक जीवनाची सुरुवात केली. प्रथम लातूर नगर परिषदेचे अध्यक्ष, त्यानंतर दोनवेळा विधानसभा आणि १९८० पासून सलग ७ वेळा लातूरचे प्रतिनिधित्व करत त्यांनी राष्ट्रीय पातळीवर आपली वेगळी ओळख निर्माण केली.सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षातही त्यांनी जाहीरनामा समितीच्या अध्यक्षपदासह अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. २००४ मध्ये निवडणूक हरूनही त्यांच्यावर विश्वास ठेवत केंद्रातील गृहमंत्रिपद देण्यात आले. मात्र २००८ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षेतील त्रुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारून त्यांनी ३० नोव्हेंबर २००८ रोजी राजीनामा दिला. २०१० ते २०१५ या काळात ते पंजाबचे राज्यपाल आणि चंदीगड केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासक म्हणून कार्यरत होते. देशातील उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार सुरू करण्याचे श्रेयही त्यांना दिले जाते. शिवराज पाटील हे सत्य साईबाबांचे निष्ठावंत अनुयायी म्हणूनही परिचित होते. इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्या मंत्रिमंडळात संरक्षण राज्यमंत्री, वाणिज्य, विज्ञान-तंत्रज्ञान, अणुऊर्जा, इलेक्ट्रॉनिक्स व अवकाश अशा महत्त्वाच्या विभागांची जबाबदारी त्यांनी सांभाळली. १९९१ ते १९९६ या काळात ते देशाचे १० वे लोकसभा अध्यक्ष होते. लोकसभेचे आधुनिकीकरण, संगणकीकरण, संसदेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण, नवे ग्रंथालय इमारत यांसारख्या उपक्रमांना त्यांनी गती दिली. देश-विदेशातील अनेक संसदीय परिषदांमध्ये त्यांनी भारताचे नेतृत्व केले. त्यांच्या काळात लोकसभेचे कामकाज अधिक पारदर्शक आणि जनसुलभ करण्यासाठी ते प्रयत्नशील राहिले. सुमारे सहा दशकांचा संसदीय आणि प्रशासकीय अनुभव, विविध मंत्रालयातील कामकाज आणि लोकसभा अध्यक्ष म्हणून केलेले योगदान यामुळे शिवराज पाटील चाकूरकर हे भारतीय राजकारणातील एक महत्त्वाचे आणि अभ्यासू राजकारणी होते. त्यांच्या निधनाने एक सुसंस्कृत नेतृत्व हरपल्याची प्रतिक्रिया राजकीय गोटातून व्यक्त होत आहे. ते एक मोठे व्यक्तीमत्व होते. मराठवाड्याचे, राज्याचे आणि देशाचे सोबतच राजकारणात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो. दैनिक राज्य लोकतंत्र च्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

# राष्ट्रीय लोकअदालतमध्ये ९६ प्रकरणात ३ कोटी ११ लाखाची वसुल



**अंबड । प्रतिनिधी**

अंबड येथे तालुका विधी सेवा समिती, अंबड व वकील संघ अंबड यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १३.१२.२०२५ रोजी जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, अंबड येथे राष्ट्रीय लोक अदालत मध्ये न्यायालयातील व दाखलपूर्व एकूण ९६ प्रकरणे निकाली काढण्यात आले. या लोक अदालतसाठी एकूण ०५ पॅनल ठेवण्यात आले होते. पॅनल क ०१ श्री.एस. बी. गायधनी जिल्हा न्यायाधीश-०१ यांनी पॅनल प्रमुख म्हणून काम पाहिले तसेच अनुकमे. पॅनल क. ०२. श्री.एम.जे.जे.वेग जिल्हा न्यायाधीश-०२ पॅनल क. ०३. श्रीमती. एस.एस. जैन, दिवाणी न्यायाधीश क. स्तर अंबड, पॅनल क. ०४. श्रीमती एस.एच. राठी, २रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर अंबड, पॅनल क. ०५ श्रीमती एस. एस. परिहार ३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर अंबड, यांनी पॅनल प्रमुख म्हणून कामे पाहिले तसेच वकील संघ अंबड येथील वकील संघ अध्यक्षा ॲड. श्रीमती. दिपा आर. गायकवाड, ॲड श्रीमती. आशा ए. दिघे, ॲड.श्री.ए.बी.येडे, ॲड श्री. आर.डी. पावसे. ॲड.श्रीमती.पी.बी. देशमुख यांनी विविध पॅनल वरती पंच म्हणून कामे पाहिली या लोक अदालत साठी वकिल संघ अंबड येथील विधीज्ञ, न्यायालयीन कर्मचारी, विविध बँकाचे अधिकारी व कर्मचारी, पोलिस स्टेशन अंबड व गोंदी येथील पोलिस, पक्षकार, महिला, जेष्ठ नागरीक यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती व या सर्वांच्या सहकार्यामुळे लोकअदालत यशस्वी रित्या संपन्न झाली.

# बीड जिल्ह्याला मिळणार आणखी एक राष्ट्रीय महागार्ग

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्राला लवकरच आणखी एक महत्त्वाचा द्रुतगती महामार्ग मिळणार असून कल्याण ते लातूर द्रुतगती महामार्गाला राज्य सरकारने हिरवा कंदील दिला आहे. या महामार्गामुळे सध्या १० ते ११ तास लागणारा कल्याण-लातूर प्रवास अवघ्या ४ तासांत पूर्ण होणार आहे. विशेष म्हणजे या महामार्गाचा मोठा भाग बीड जिल्ह्यातून जाणार असल्याने बीडच्या विकासाला मोठी चालना मिळणार आहे.**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने प्रस्तावित केलेल्या ४४२ किलोमीटर लांबीच्या या द्रुतगती महामार्गाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर येथे झालेल्या आढावा बैठकीत मंजुरी दिली. त्यामुळे अनेक दिवसांपासून कागदावर असलेला हा प्रकल्प आता प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दिशेने जाणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या मंजुरीनंतर आता MSRDC कडून या महामार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल अंतिम मंजुरीसाठी पाठवण्यात येणार असून त्यानंतर भूसंपादन व आराखडा तयार करण्याच्या कामाला सुरुवात होईल.बीड जिल्ह्यासाठी काय बदलणार?हा महामार्ग अहिल्यानगर, बीड, मांजरसुंबा घाट, अंबाजोगाई मार्गे थेट लातूरकडे जाणार आहे. त्यामुळे बीड जिल्हा थेट मुंबई-ठाणे-कल्याण या औद्योगिक पट्ट्याशी जोडला जाणार आहे. यामुळे - बीड ते मुंबई प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल व्यापारी, उद्योजक, शेतकरी व विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळेल बीड जिल्ह्यातील औद्योगिक, कृषी व पर्यटन क्षेत्राला चालना मिळेल रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील माळशेज घाटात ८ किमीचा बोगदाया महामार्गासाठी माळशेज घाटात सुमारे ८ किलोमीटर लांबीचा बोगदा तयार केला जाणार आहे. त्यामुळे घाटातील अवघड आणि वेळखाऊ प्रवास सुकर होणार आहे. बीड-अंबाजोगाई-मांजरसुंबा हा मार्ग अधिक सुरक्षित व वेगवान बनेल.हा महामार्ग पुढे लातूरवरून महाराष्ट्र- कर्नाटक सीमेपर्यंत जाणार असून कर्नाटककडे जाणारी वाहतूकही सोपी होणार आहे. तसेच हा मार्ग विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेशी जोडला जाणार असल्याने राज्यातील दळणवळण जाळे अधिक मजबूत होणार आहे. एकंदरीत, बीड जिल्ह्यातून जाणारा हा द्रुतगती महामार्ग म्हणजे मराठवाड्यासाठी विकासाचा नवा 'एक्सप्रेस' ठरणार असून, कल्याण-लातूर अंतर प्रत्यक्षात आणि अर्थानेही अधिक जवळ येणार आहे.

# कमी झोप घेणाऱ्यांत लठ्ठपणाचा धोका जास्त-डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतनिधी**

**आपण कमी झोप घेतो तेव्हा केवळ थकवा किंवा एकाग्रतेची समस्या निर्माण होत नाही तर याचा थेट संबंध वजन वाढण्याशी जोडला जातो. म्हणजेच अपुरी झोप ही लठ्ठपणाचे एक महत्वाचे कारण ठरू शकते. झोपेअभावी शरीरात काय बदल होतात ? झोप कमी झाल्यावर शरीरातील ग्रेलिन (भूक वाढवणारा हार्मोन) वाढतो व लेप्टिन (पोट भरल्याची जाणीव करून देणारा हार्मोन) कमी होतो. आपल्याला वारंवार भूक लागते आणि आपण जास्त प्रमाणात, अनेकदा चुकीचे पदार्थ (तळलेले, गोड, थंड पेये) खाऊ लागतो. झोपेच्या कमतरतेमुळे मेटाबॉलिझम मंदावतो. म्हणजे शरीरातील कॅलरी जाळण्याचा वेग कमी होतो व अतिरिक्त कॅलरी फॅटच्या स्वरूपात साठू लागतात. ताण वाढवणारा कॉर्टिसोल हार्मोन झोप कमी झाल्यावर जास्त प्रमाणात तयार होतो.**



हृदयरोग, मधुमेह (डायबिटीज), डिप्रेशन व मानसिक आरोग्याच्या समस्या, स्मरणशक्ती कमी होणे, पचनासंबंधी त्रास,,कब्ज चांगली झोप येण्यासाठी उपाय, दररोज ठरलेल्या वेळी झोपण्याची आणि उठण्याची सवय लावा., झोपण्यापूर्वी मोबाईल,टी.व्ही.लॅपटॉप यांचा वापर टाळा, झोपण्यापूर्वी जड किंवा तेलकट अन्न घेऊन नका, हलके जेवण करा., दिवसभर पुरेसे पाणी प्या,शरीर हायड्रेटेड ठेवा, दारु व कॅफिनयुक्त पेये (चहा,कॉफी,कोल्ड ड्रिंक)टाळा. चांगल्या आरोग्यासाठी झोप ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. वयाच्या विविध टप्प्यांवर दररोज झोपेचे नियोजन करणे गरजेचे असल्याचा सल्ला आरोग्य तज्ज्ञ (३ देतात. नवजात बाळ महिन्यांपर्यंत) १४ ते १७ तास, बाळ (४ ते १२ महिने) १२ ते १६ तास, लहान मुले (१ ते ५ वर्षे) १० ते १४ तास, शाळेतील मुले (६ ते १२ वर्षे) ९ ते १२ तास.किशोरवयीन मुले (१३ ते १७ वर्षे) ८ ते १० तास, प्रौढ (१८ वर्षांवरील) ७ ते ९ तास, हे आकडे आपल्याला झोपेच्या गरजेबद्दल एक ढोबळ कल्पना देतात. प्रमुख आरोग्य संस्थांनी ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार नवजात बालके, लहान मुले, किशोरवयीन आणि प्रौढांमध्ये ही गरज वेगवेगळी असते. विविध अभ्यासांनुसार यामध्ये थोडेफार बदल असू शकतात, पण हे आकडे प्रत्येक वयोगटासाठी सामान्यतः अचूक आहेत. बालकांचा मेंदू आणि शरीर वेगाने वाढते आणि त्यांच्या मज्जातंतूंचे जाळे तयार होत असते. या टप्प्यावर, झोप ही स्मरणशक्ती, शिकणे आणि रोगप्रतिकारशक्तीच्या विकासासाठी महत्त्वाची असते. मुले मोठी होतात, हे तसतसा मेंदूच्या विकासाचा वेग कमी होतो. जरी शिकणे व भावनिक व नियंत्रणासाठी झोप महत्त्वाची असली तरी, एकूण गरज कमी होते. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले.

# स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त जिव्हाळा अनाथांना केले नवनाथ शिरोळे यांनी अन्नदान

**बीड । प्रतिनिधी**

स्वातंत्र भारत देशाचे माजी केंद्रीय मंत्री स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त १२ डिसेंबर रोजी सायंकाळी साडेसातच्या दरम्यान बीड शहरातील नामांकित असलेले भाजी मंडई या ठिकाणी जिव्हाळा बेघर येथे असलेले ३७ वयोवृद्ध माता-पिता यांना स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेबांच्या जयंती निमित्त अन्नदान करून एक आगळी वेगळी जयंती साजरी करून समाजामध्ये एक उत्कृष्ट आदर्श निर्माण करणारे असे भारतीय जनता पार्टीचे नेते तथा भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे मुंबई प्रदेशचे प्रवेश उपाध्यक्ष मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी हा चांगल्या प्रकारे उपक्रम राबवून सर्व समाजामध्ये एक मुंडे साहेबांनी उत्कृष्ट आदर्श निर्माण केला व जसे संपूर्ण भारत देशामध्ये ज्यांची ओळख आज ही कायम लोकांच्या मनामध्ये आहे व स्वर्गीय मुंडे साहेबांचे नाव आज लोक आधार पूर्वक घेतात असे आमचे आदर्श नेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब यांनी आदर्शदायक काम केले आहे त्यांनी सर्व समाजासाठी समाज हिताचे कार्य करून भारत देशामध्ये एक बीड जिल्ह्याचे नाव स्वर्गीय मुंडे साहेब यांनी लौकिक केले आहे म्हणून त्यांचाच एक आदर्श घेऊन आम्ही पुढे जात आहोत मुंडे साहेबांनी बीडला रेल्वे यावी यासाठी खूप मोलाचे प्रयत्न त्यांनी केले आणि बीडला रेल्वे आणण्यामध्ये खूप मोठा सिंहाचा वाटा स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेबांचा आहे हे देखील बीडच्या सुसंस्कृत नागरिकांमधून वेळोवेळी बोलले जात आहे असे या ठिकाणी आभार व्यक्त करताना मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी आपल्या उत्कृष्ट विवेक पूर्वक विचारातून आपले विचार मांडले तसेच या ठिकाणी भारतीय जनता पार्टीचे राज्याचे



सरचिटणीस सर्जेराव तात्या तांदळे यांनी देखील मुंडे साहेबांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकत मुंडे साहेबांनी सर्व बहुजन समाजासाठी आपले जीवन व्यतीत केले आहे त्यांनी बीड जिल्ह्यामध्ये रेल्वे यावे दळणवळण चांगल्या प्रकारे चालवे सर्वांच्या हाताला काम मिळावे जेणेकरून बेरोजगारी कमी होऊन रोजगारी वाढेल बीड जिल्हा आर्थिक बाबतीमध्ये विकासित होईल हे स्वप्न पाहिले होते ते स्वप्न त्यांचे आता पूर्ण झाले आहे याचा देखील सर्व बीड करांना सार्थ अभिमान वाटतो की मुंडे साहेबांमुळे आज बीडला रेल्वे आली आहे म्हणून मुंडे साहेबांचे विचार सर्वांनी अकस्मात करावे आणि त्या विचाराने चालावे जेणेकरून कुठेच अडथळा निर्माण होणार नाही असे विचार मुंडे साहेबांचे प्रेरणादायी आहेत असे आपल्या मनोगत पर बोलताना सर्जराव तात्या यांनी थोडक्यात आपले सुसंस्कृत विचार या ठिकाणी व्यक्त केले तसेच या ठिकाणी भारतीय जनता पार्टीच्या नेत्या तथा बीड जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष श्रीमती मीराताई गांधले मॅडम यांनी देखील स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या विचारांना चालना देऊन आम्ही पुढे महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे यांच्या आदेशाप्रमाणे व त्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्वजण बीड जिल्ह्यामध्ये भारतीय जनता पार्टीचे आता काम करत आहोत आणि भारतीय जनता पार्टी हा एक संपूर्ण भारतामध्ये असा पक्ष आहे की तो सर्वांना न्याय देणारा पक्ष आहे मग लाडकी बहीण योजना असो की महिलांसाठी विविध योजना असो या सर्व महिलांचे पदरात कशा पडतील यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे भारतीय जनता पार्टीचे सर्वच नेते आहेत मग यामध्ये स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब असो की सध्या महाराष्ट्रामध्ये त्यांच्या पश्चात त्यांच्या एक उत्कृष्ट सुसंस्कृत विचाराने उत्कृष्ट प्रकारे कार्य करणारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र जी फडणवीस साहेब असोत किंवा महाराष्ट्राच्या कॅबिनेट मंत्री सन्माननीय पंकजाताई मुंडे असोत हे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या विचाराने चालणारे व्यक्तिमत्व आहेत म्हणून आपण भविष्यात भारतीय जनता पार्टीचे जाळे बीड जिल्ह्यातील प्रत्येक घराघरांमध्ये निर्माण करून एक चांगल्या प्रकारे पक्ष संघटन मजबूत कसे करता येईल याकडे आपण लक्ष देणार असल्याचेही मीराताई गांधले यांनी आपल्या उत्कृष्ट थोडक्यात मांडलेल्या विचारात आपले विचार व्यक्त केले यावेळी येथे उपस्थित असलेले बीड जिल्हा सत्र न्यायालयातील सुप्रसिद्ध संस्कृत लोकांना कायद्याच्या बाबतीत उत्कृष्ट न्याय देवतेकडून न्याय मिळवून देणारे असे एडवोकेट गोविंद जी शिराळे पाटील तसेच भारतीय जनता पार्टी कार्यालय प्रमुख केशव बडे साहेब तसेच बीड शहरातील सर्व प्रतिष्ठित नागरिक तसेच पत्रकार तक्षशिला सोनवणे मॅडम सह पसंजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर यांच्यासह जिव्हाळा केंद्रातील अभिजीत वैद्य साहेब छायाताई सह आदी मान्यवर उपस्थित होते.

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे

पिक गेले, त्यांच्या जमिनी खरवडल्या दुसऱ्या बाजूला बियाणे, खते, कीटकनाशके यांच्या किमती वाढल्या आहेत. सोयाबीन, कापूस, धान शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव मिळत नाही. काळया मातीशी ईमान ठेवणाऱ्या या बळीराजाची फसवणूक महायुती सरकारने केली आहे. शेतकरी आत्महत्येचे पाप या सरकारचे आहे, अशी टीका यावेळी वडेट्टीवार यांनी केली.

-------------

### २१ डिसेंबरपर्यंत मिळणार

मतदान आहे. यानंतर २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. त्यामुळे या निवडणुकीआधी महिलांच्या खात्यात पैसे येण्याची शक्यता आहे. लाडकी बहीण योजनेत फक्त पात्र महिलांनाच पैसे मिळणार आहेत. ज्या महिलांनी निकषांबाहेर जाऊन योजनेचा लाभ घेतला आहे त्यांचा लाभ बंद केला जाणार आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून लाभार्थी महिलांची तपासणी सुरु आहे. याअंतर्गत दर महिन्याला अनेक महिला अपात्र ठरतात. त्यामुळे अपात्र ठरलेल्या महिलांना पैसे मिळणार नाहीत.

----------

### शिक्षकांच्या रिक्त जागांवरून

शिक्षण हा इतका महत्त्वाचा विषय असूनही सरकार याकडे दुर्लक्ष करत आहे. चंद्रपूर जिल्ह्यात शिक्षकांची पदे रिक्त आहेत. एका मर्यादित कालावधीत या जागा भराव्यात. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी राज्यात पंधरा हजार शिक्षकांची पदे रिक्त असल्याची माहिती सभागृहात दिली. यावर वडेट्टीवार यांनी आक्षेप घेत राज्यात ३७ हजार शिक्षकांची पदे रिक्त आहेत, अधिकारी सरकारची दिशाभूल करत आहेत, सरकारच्या पोर्टलचे नाव पवित्र असले तरी अपवित्र काम सुरू आहे अशी टीका त्यांनी केली. राज्यातील जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत प्राथमिक शिक्षकांची दरवर्षी राबविण्यात येणारी संगणकीय बदली प्रक्रिया मागील तीन वर्षांपासून प्रलंबित असल्याने सुमारे बारा हजार शिक्षक बदलीच्या प्रतीक्षेत असल्याची बाब दि.२४ ऑक्टोबरला निदर्शनास आली, यामागील सत्यता काय, असा प्रश्न भाजपचे दक्षिण नागपूरचे आमदार मोहन मते यांनी उपस्थित केला होता.

-------------

### भत्ते रखडले:अंगणवाडी

१० हजार व मदतनीस महिलेला ८ हजार रुपये मानधन मिळते. त्यात वाढ व्हावी अशी अनेक वर्षांची मागणी होती. सरकारने ती ऑक्टोबर २०२४ मध्ये मान्य केली. सेविकेला १५ हजार रुपये, मदतनिसाला १३ हजार रुपये मानधन देणार, असे जाहीर केले. प्रत्यक्षात सेविकेला १३ हजार व मदतनिसाला १० हजार रुपये देण्याचे पत्रक काढले. उर्वरित रक्कम ॲप आधारित कामांच्या टक्केवारीवर प्रोत्साहन भत्ता म्हणून देण्यात येईल, असे जाहीर करून त्याचे कोष्टकही जाहीर केले. त्यानुसार ॲप आधारित कामे (माता, बालके यांची गृहभेट, पोषण आहार वाटप, पूर्व शालेय शिक्षण दिवस भरणे, आजारपणाची संख्या कमी करणे ही कामे करून ती ॲपवर अपलोड करणे) ७० टक्के पूर्ण केली तर १४०० रुपये, ८० टक्के झाली तर १६०० रुपये, ९० टक्के झाली तर १८०० रुपये व १०० टक्के झाली तर २ हजार असे निश्चित केले. मदतनीस महिलांनाही याच प्रमाणे ७००, ८०० व पुढे ९००, १ हजार रुपये असा प्रोत्साहन भत्ता निश्चित केला. जास्त पैसे मिळणार या आशेने अंगणवाडी सेविका व मदतनीस ऑक्टोबर २०२४ पासून काम करत आहेत. मात्र, हा प्रोत्साहन भत्ता फक्त मदतनीस महिलांच्याच बँक खात्यात जमा झाला आहे. राष्ट्रीय मजदूर संघाच्या अंगणवाडी विभागाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, लाडकी बहीण योजनेत सुरुवातीच्या काळात अनेक महिलांना आम्ही अर्ज लिहून दिले. त्यासाठीही आम्हाला मानधन मिळणार होते. मात्र, तेही अद्याप अनेक ठिकाणी मिळालेले नाही. प्रोत्साहन भत्ता व हे मानधन यातून सरकारकडे अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे लाखो रुपये थकले आहेत. ते मिळावेत, अशी मागणी राष्ट्रवादी मजदूर संघाच्या माध्यमातून सरकारकडे केली आहे, असे थिटे यांनी सांगितले.

---------------

### बालकांच्या टाळूवरचे लोणी

आणि जग पाहण्यापूर्वीच जगातून एक्झिट घेणाऱ्या बालकांचा जीव वाचवावा, असे खडे बोल रोहित पवार यांनी सरकारला सुनावले. कुपोषणामुळे होत असलेले बालमृत्यू रोखण्यासाठी राज्य सरकार करोडो रुपये खर्च करुन विविध योजना राबवीत आहे. पण कुपोषणाचे प्रमाण वाढले असून ४९ हजार बालमृत्यू झाले आहेत का, असा प्रश्न स्नेहा दुबे, मनोज जामसुतकर, चेतन तुपे आदींनी विधानसभेत उपस्थित केला होता. त्यावर आबिटकर यांनी १४ हजार ५२६ बालमृत्यू झाल्याचे म्हटले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या शाश्वत विकास ध्येय २०३० नुसार नवजात शिशू मृत्यू दर प्रति एक हजारामागे १२ पेक्षा कमी करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

**बालमृत्यूच्या संदर्भात आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची कबुली**

महायुती सरकारच्या कार्यकाळात म्हणजे २०२२-२३ ते २०२४-२५ या ३ वर्षात राज्यात कुपोषणामुळे १४ हजार ५२६ बालमृत्यू झाले, अशी कबुली आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत दिली. हे बालमृत्यू मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती, अकोला आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये शून्य ते पाच वर्षे वयोगटातील मुलांचे असल्याची धक्कादायक माहिती आबिटकर यांनी विधानसभेत उपस्थित झालेल्या प्रश्नाच्या लेखी उत्तरात दिली आहे.

-------------

### सारथी-बार्टीकडून मिळणाऱ्या

जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना प्राधान्याने मदत करण्याचा सरकारचा उद्देश आहे. राज्य सरकारच्यावतीने टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत यासारख्या स्वायत्त संस्थांच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ काही ठिकाणी एकाच कुटुंबातील एकापेक्षा अधिक विद्यार्थ्यांना मिळत असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. या अनुषंगाने माहिती संकलनाची प्रक्रिया सुरू असून, सध्या या शिष्यवृत्तीसाठी या संस्थांचा निम्म्यापेक्षा अधिक निधी खर्च होत आहे. त्यामुळे इतर गरजू विद्यार्थ्यांसाठीच्या योजनांसाठी निधी उपलब्धतेवर परिणाम होऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत, असे त्यांच्याकडून सांगण्यात आले. तसेच, स्वायत्त संस्थांच्या वार्षिक कृती आराखड्यास मान्यता देण्याच्या विषयावर मंत्रीमंडळाच्या बैठकीत प्रदीर्घ चर्चा झाली असून या चर्चेनंतर झालेल्या निर्णयानुसार मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली आहे. या बैठकीत अधिछात्रवृत्ती योजनेंतर्गत युजीसीमार्फत विहित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करुन अधिछात्रवृत्ती योजनचे निकष उच्च व तंत्रशिक्षण विभागाने तयार करावेत. यामध्ये विद्यार्थ्यांचा वार्षिक प्रगती अहवाल तपासून उर्वरीत अनुदान वितरीत करण्याच्या प्रक्रियेचा समावेश करुन त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना तंत्र शिक्षण विभागाला देण्यात आल्या आहेत. शिष्यवृत्ती देताना प्रत्येक घटकासाठी लाभार्थ्यांची संख्या निश्चित करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेणार आहे, अशी माहिती अजित पवारांनी दिली.

-------------

### मेस्सीच्या कार्यक्रमात प्रचंड गोंधळ;

पूर्णपणे नियंत्रणात आहे. तपासाच्या अनुषंगाने एफआयआर दाखल करण्यात आला असून मुख्य आयोजक सताद्रु दत्ता यांना अटक करण्यात आली आहे. ते पुढे म्हणाले, आयोजकांनी चाहत्यांचे तिकीटाचे पैसे परत देण्याचे आश्वासन दिले आहे आणि ही प्रक्रिया कशी राबवता येईल, याचा आम्ही आढावा घेणार आहोत.

-----------

### एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री

यांची भेट घेतल्यानंतर भाजप नेत्यांचा सूर बदलला आहे. भाजपला त्यांची भूमिकेवरून माघार घ्यावी लागली आहे. शिंदे यांनी स्वतःची ताकद दाखवून दिली आहे. त्यामुळे ते पुढील महिना दोन महिन्यात पुन्हा मुख्यमंत्री झालेले दिसतील. शरद पवार व एकनाथ शिंदे यांची बैठक झाली. यातून जो संदेश द्यायचा तो दिला गेला आहे, असेही ॲड. आंबेडकर म्हणाले.

------------

### बकऱ्या जंगलात सोडा, वनमंत्र्यांच्या


या समस्येचे निराकरण करण्यासाठी सरकार सध्याच्या बचाव केंद्रांची क्षमता वाढवण्याचे आणि नवीन सुविधा उभारण्याचे काम करत आहे. वनविभागाच्या माहितीनुसार, अहिल्यानगर, पुणे आणि नाशिक जिल्ह्यांमध्ये बिबट्यांशी संबंधित सर्वाधिक घटनांची नोंद असल्याचे पवार म्हणाले.

---------------

# महामार्गावर प्रवाशांना लुटणारी टोळी एलसीबीने पकडली

**बीड । प्रतिनिधी**

**धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर प्रवाशांची वाहने अडवून, काचा फोडून व शस्त्राचा धाक दाखवून दरोडा व जबरी चोरी करणाऱ्या सराईत टोळीला बीड स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. या कारवाईत महामार्गावरील एक दरोडा व तीन जबरी चोरी असे एकूण चार गंभीर गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या आदेशानुसार महामार्गावरील गुन्हे उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक तयार करण्यात आले होते. पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर यांच्या पथकाने सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण व गुप्त माहितीद्वारे तपास सुरू ठेवला असता, ११ डिसेंबर २०२५ रोजी आरोपी कळंब (जि. धाराशिव) येथून केजच्या दिशेने येत असल्याची माहिती मिळाली.**



मिळालेल्या माहितीनंतर पथकाने तातडीने नाकाबंदी केली. पोलिसांना पाहताच आरोपींनी वाहन न थांबवता पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी पाठलाग करून काळ्या रंगाच्या एमजी हेक्टर कारमधून आरोपींना ताब्यात घेतले.

उघडकीस आलेल्या घटना १. दि. ४ डिसेंबर २०२५ - वडगाव ढोक (ता. गेवराई): जॅकेट घालून रस्त्यावर वाहन अडवून बाहेरील राज्यातील प्रवाशांना मारहाण करत सोने व रोख रक्कम लुटली. (पो.स्टे. गेवराई, गु.र.नं. ७१४/२०२५) २. दि. २५ सप्टेंबर २०२५ - संभाजी महाराज चौक, बीड: पहाटे चालक झोपले असताना वाहनाची काच फोडून प्रवाशांना मारहाण करत सोने-चांदीचे दागिने हिसकावले. (पो.स्टे.बीड ग्रामीण, गु.र.नं. ३१६/२०२५) ३. दि. २० नोव्हेंबर २०२५ - हॉटेल दुबई समोर: पार्क केलेल्या वाहनाची काच रॉडने फोडून शस्त्राचा धाक दाखवत मौल्यवान वस्तू चोरल्या. (पो.स्टे. बीड ग्रामीण, गु.र.नं. ४०२/२०२५) ४. दि. ९ नोव्हेंबर २०२५ - धनवडे वस्ती (पाली): रात्री आयआरबी पार्किंग परिसरात वाहन अडवून खिशातील रोख रक्कम बळजबरीने काढून घेतली. (पो.स्टे. बीड ग्रामीण, गु.र.नं. ४१७/२०२५)अटक आरोपी सर्व आरोपी रा. मकरवाडी, ता. वाशी, जि. धाराशिव१. राहुल अनिल काळे (वय १९) २. विकास अनिल काळे (वय २१)३. अनिल राम काळे (वय ४०) या आरोपींनी त्यांचे साथीदार सुनील हिरमन दशांदे, सचिन उर्फ आवड्या राम काळे व बबलू शिव दशांदे (सर्व रा. मकरवाडी) यांच्यासह वरील चारही गुन्हे केल्याची कबुली दिली अ

## थोडक्यात



## साई सेवा परिवार बीड ते शिर्डी पाई पालखी सोहळा

बीड । प्रतिनिधी

गुरुदत्त जयंतीचे औचित्य साधून बीड ते श्री क्षेत्र शिर्डी १० दिवसीय पायी वारीचे आयोजन श्री साई सेवा परिवार बीडच्या वतीने आयोजित करण्यात आलेले होते.हा सोहळा ४ डिसेंबर रोजी प्रारंभित झालेला होता तर हा पायी पालखी सोहळा १३ डिसेंबर रोजी संपन्न झाला. या पायी पालखी सोहळ्याचे हे १९ वे वर्ष सुखाने व समृद्धीने संपन्न झालेले आहे. सर्व जाती-धर्मातील युवकांना एकत्र करत श्री साई सेवा परिवार हा गेल्या १९ वर्षांपासून या सोहळ्याचं आयोजन करत झालेला आहे. काल हाच पायी पालखी सोहळा शिर्डी या ठिकाणी मोठ्या थाटामाटात व उत्साहामध्ये संपन्न झालेला पाहायला मिळाला.

बीड शहरातून प्रत्येक वर्षी गुरुदत्त जयंतीचे औचित्य साधून बीड ते श्री क्षेत्र शिर्डी १० दिवसीय पायी पालखी सोहळा आयोजित करण्यात येत असतो. यावेळी देखील मोठ्या हर्षवल्लसाने व उत्साहामध्ये हा पालखी सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी या पालखी सोहळ्याला सर्व जाती-धर्मातील तरुणांची मोठ्या संख्येने उपस्थिती पाहायला मिळाली होती तर हा १३ डिसेंबर रोजी संपन्न झाला आहे.

## सेवानिवृत्त मुख्याध्यापक रामराव निर्मळ यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी



येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक रामराव भाऊराव निर्मळ यांचे वय ८५ वर्षे,यांचे वृद्धापकाळाने दि.१३ डिसेंबर शनिवार रोजी पहाटे ४;०० वाजता राहते घरी निधन झाले. शहरातील सम्राट अशोक नगर येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक रामराव भाऊराव निर्मळ यांचे वय ८५ वर्षे,यांचे वृद्धापकाळाने दि.१३ डिसेंबर शनिवारी रोजी पहाटे ४:०० वाजता राहते घरी निधन झाले.त्यांचे पश्चात पत्नी,सहा मुले, तीन मुली,नातवंडे असा परिवार असून ते पत्रकार पृथ्वीराज निर्मळ यांचे ते वडील होते. त्यांचा अंत्यविधी मंगलनाथ स्मशानभूमी येथे दुपारी ४:०० करण्यात आला.



## एड्स रोगाचे समूळ उच्चाटन करून निरोगी समाज निर्माण करूया -डॉ.सुनील जाधव

पाटोदा । प्रतिनीधी

पाटोदा येथील जय भवानी काला व विज्ञान महाविद्यालय आणि कलम बीड राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त विविध स्पर्धाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले या स्पर्धेचे उद्घाटन गोरे मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शन म्हणून प्राचार्य सदाशिव सरकटे डॉ विश्वास कदम प्रा सोमनाथ घाडगे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ सुनील जाधव हे होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक लोखंडे सर यांनी केले जागतिक योग दिनानिमित्त महाविद्यालयात जनजागृती आली रांगोळी स्पर्धा व्याख्यान भितीपत्रकाचे आयोजन आरोग्य तपासणी तपासणी शिबिराची आयोजन करण्यात आले या विषयावर बोलताना डॉ सुनील जाधव यांनी आपले विचार मांडले निरोगी समाजासाठी आव्हान उपस्थितांना केले या कार्यक्रमासाठी एड्स नियंत्रण कक्ष बीड डॉ सुहास कुलकर्णी सर यांनी सहकार्य केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कनिष्ठ विभाग प्रमुख प्राध्यापक प्रकाश नाईकवाडे प्राध्यापक जाहीद सिद्दीकी सौ रकटे मॅडम. डॉ कल्पना घारगे मॅडम यांनी रांगोळी स्पर्धेचे परीक्षण केले उत्कृष्ट विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाचे आभार प्राध्यापक बापू घोक्षे यांनी मांडले या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी विद्यार्थिनी प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गंगुबाई सुंदरराव शेळके यांचे निधन

वडवणी । प्रतिनिधी

मोरवडसारख्या छोट्याशा गावातही आपुलकीचा, मायेचा आणि सेवाभावाचा मोठा वारसा जपणाऱ्या गंगाबाई सुंदरराव शेळके (वय १००) यांचे शुक्रवार रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. पंचायत समितीचे माजी सदस्य आनंत (बप्पा) शेळके व बाबुराव शेळके यांच्या त्या मातोश्री होत.



गंगुबाई शेळके या संपूर्ण आयुष्यात सामाजिक बांधिलकी जपत सामान्य लोकांच्या सुख-दुःखात सहभागी राहिल्या. परिसरात त्यांची ओळख ''भोजाई'' या लाडक्या नावाने होती. कोणीही दुःखित, अडचणीत असलेला माणूस दारात आला तर त्याला दिलासा देणे, धीर देणे हे त्यांचे आयुष्यभराचे ध्येय होते. स्वर्गीय सुंदररावजी शेळके पाटील यांच्यासोबत संसार करत असताना त्यांनी जनमानसाशी घट्ट नातं जपलं. लोकांत मिसळून राहणे, सर्वांना जवळ घेणे, समाजासाठी सतत उभे राहणे या गुणांमुळे त्या गावातच नव्हे तर परिसरातही आदराने ओळखल्या जात होत्या. गंगुबाई यांच्या शैक्षणिक कार्याचीही मोठी परंपरा आहे. कै. सुंदररावजी काका शेळके पाटील माध्यमिक विद्यालय, मोरवड या संस्थेमुळे हजारो विद्यार्थी घडले आणि आज विविध क्षेत्रात उच्च पदांवर कार्यरत आहेत. या संस्थेच्या उभारणीपासून ते विकासापर्यंत गंगाबाई यांचे मोलाचे सहकार्य राहिले. सामाजिक कार्याबरोबरच त्यांना अध्यात्मिक क्षेत्राचीही खोल आवड होती. किर्तन, भजन, प्रवचन ऐकणे आणि धार्मिक कार्यक्रमांत सहभाग घेणे हा त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग होता. त्यांच्या पश्चात पुत्र आनंत (बप्पा) शेळके, बाबुराव शेळके, सहा मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## अतुल जवणे यांना पत्रकारिता क्षेत्रातील जिजाऊ माँसाहेब पुरस्कार

कडा । प्रतिनिधी



मराठा सेवा संघ प्रणित तानुबाई बिरजे पत्रकार परिषद आष्टी यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना जिजाऊ माँसाहेब आदर्श पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत या वर्षाचा आदर्श पत्रकार हा पुरस्कार देवळाली येथील पत्रकारिता क्षेत्रात काम करणारे श्री अतुल नारायणराव जवने यांना जिजाऊ माँसाहेब आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर झाला असल्याची माहिती जेष्ठ पत्रकार सिताराम पोकळे यांनी दिली

आष्टी तालुक्यातील चैतन्य स्वामींच्या पदस्पर्शाने पावणभुमी देवळाली पानाची येथील रहिवासी श्री अतुल नारायणराव जवणे हे १४ वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात कार्य करत आहेत दै. चंपावती पत्र या वृत्तपत्रासाठी कार्य करतात तसेच त्यांनी २०२४ साली महाराष्ट्र सुपरफास्ट न्यूज पोर्टल सुरू केलेले असून या पोर्टलच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न मांडत आहेत तसेच राष्ट्रीय मानवाधिकार सुरक्षा संघाचे आष्टी तालुका अध्यक्ष व पत्रकार कृती हल्ला समितीचे आष्टी तालुका निमंत्रक म्हणून पद भूषवत आहेत आपल्या पत्रकारीतेच्या माध्यमातून त्यांनी विविध समस्यांना वाचा फोडली आहे.गोरगरीब सर्वसामान्य जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी ते सदैव तत्पर असतात विविध सामाजिक क्षेत्रात पत्रकार अतुल जवणे यांचा सन्मान झाला आहे या पुरस्कारामुळे त्यांच्या गौरवशाली कार्यात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे




## विद्यार्थ्यांनी आयबीएम प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा - प्राचार्य सानप

माजलगाव । प्रतिनिधी

सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भविष्यातील संधीचा विचार करून आयबीएम प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य जी.के.सानप यांनी केले.

सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आयोजित आयबीएम स्कील बील्ड प्रोग्राममध्ये ते बोलत होते.या कार्यक्रमास प्रा. विकास सोळंके, पत्रकार कमलेश जाब्रस,प्रा.किरण गलबे,प्रा. सौरवकुमार सुमन, प्रा.जावेद चाउस, प्रा.देशमुख,प्रा. स्वामी,श्रीमती पायल,कल्पना राउत,सुमेरा शेख यांची उपस्थिती होती.यावेळी बोलताना प्राचार्य सानप म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरता सोळंके महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील आहे. आयबीएम प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना तज्ञ प्रशिक्षकाकडून मार्गदर्शन करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेऊन आगामी काळात नोकरीच्या संधीसाठी प्रयत्न करावे असे आवाहन करण्यात आले.

## पापा मोदींचा विश्वास सार्थ ठरवत स्टार प्रचारक डॉ.इंगोले यांनी घणाघाती भाषणांनी गाजविली नगरपालिका निवडणूक

अंबाजोगाई । प्रतिनिधी

नगरपरिषदेच्या निवडणुकीचा चार जागांसाठीचा प्रचार सुरू झाला आहे. यंदा अनेक आरोप प्रत्यारोप होवून ही निवडणूक सर्वसामान्यांमध्ये चर्चेचा विषय ठरली आहे. अंबाजोगाईतील पंधरा प्रभागांमध्ये लोकविकास महाआघाडीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार राजकिशोर मोदी यांच्या लोकविकास महाआघाडीच्या कॉर्नर बैठका सभा घेण्यात आल्या. एक ते पंधरा प्रभागांमध्ये डॉ.राजेश इंगोले यांच्या अभ्यासपूर्ण, मुद्देसूद व घणाघाती भाषणांनी लोकांचे मत परिवर्तन आणि मन परिवर्तन झाल्याचे दिसून येत आहे. एकूण काय तर स्टार प्रचारक डॉ.राजेश इंगोले यांच्या तडाखेबंद भाषणांनी अंबाजोगाई नगरपालिकेची निवडणूक गाजत आहे हे विशेष होय.




डॉ.राजेश इंगोले यांचे अंबाजोगाई शहराच्या स्वच्छतेबाबत, अंबाजोगाई शहराच्या सुरक्षिततेबाबत, अंबाजोगाई शहराच्या भाईचाऱ्याबाबत, शहराच्या आगामी विकासाबाबत मुद्द्यांनी लोकांच्या मनाला साद घातलेली सर्वत्र दिसून येत आहे. राजकिशोर (पापा) मोदी यांच्या लोकविकास महाआघाडीचे स्टार प्रचारक म्हणून ही डॉ.राजेश इंगोले यांचे नांव अंबाजोगाई शहरात सर्वत्र गाजत आहे. यावेळेस विविध प्रभागांमधून डॉ.राजेश इंगोले यांच्या सभांना प्रचंड मागणी झाली. तशीच काहीशी परिस्थिती आता उर्वरित राहिलेल्या ४ प्रभागातील उमेदवारांसाठी असल्याचे दिसून येत आहे. डॉ.राजेश इंगोले यांच्या सभा आमच्या वार्डात द्या असे साकडे लोकविकास महाआघाडीचे उर्वरित ४ उमेदवार राजकिशोर (पापा) मोदी यांच्याकडे करीत आहेत. या निवडणुकी मध्ये लोकविकास महाआघाडीची भूमिका अत्यंत अभ्यासपूर्ण मुद्दे घेत, लोकांपुढे अत्यंत सहजतेने पापा मोदी यांनी मागील काही वर्षांपासून केलेले सातत्यपूर्ण विकास कामे, यापुढे आपल्याला अंबाजोगाई शहरासाठी काय करायचे आहे याचे एक व्हिजन लोकांपुढे मांडत आहेत. डॉ.राजेश इंगोले यांची भाषण शैली, मुद्दे मांडण्याची पद्धत, चपखल शेरोशायरी ही सभांमध्ये लोकांना अत्यंत भावत असून लोकविकास महाआघाडीचा विजय सुकर करण्याचे काम डॉ.राजेश इंगोले यांच्या प्रभावी भाषणांनी होत आहे असे मत अनेक जाणकार बुद्धिवंत मंडळी करीत आहेत. अंबाजोगाईच्या विकासाच्या विविध मुद्द्यांना प्रलंबित प्रश्नांना आणि भविष्यात अंबाजोगाई कशी असावी या वैविध्यपूर्ण मुद्यांचा आपल्या खुमासदार शैलीत, शेरोशायरी चारोळ्या, कवितांचा नेमकेपणाने उपयोग करून डॉ.राजेश इंगोले प्रभावीपणे लोकविकास महाआघाडीचे विचार सर्वसामान्यपणे पोचविण्यात यशस्वी ठरले आहेत. लोकविकास महाआघाडीचे राजकिशोर (पापा) मोदी व माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी कल्पकतेने डॉ.राजेश इंगोले यांच्या वक्तृत्वाचा समाजात असलेल्या प्रभावाचा, प्रतिमेचा व्यक्तिमत्वाचा उपयोग करून लोकविकास महाआघाडीच्या विजयाच्या दिशेने होणाऱ्या वाटचाल निश्चित केली आहे. खऱ्या अर्थाने पापा मोदींचा विश्वास सार्थ ठरवत आपल्या अभ्यासपूर्ण, तडाखेबंद व घणाघाती भाषणांनी नगरपालिका निवडणूक गाजविणारे डॉ.राजेश इंगोले हे स्टार प्रचारक ठरले आहेत.

## पान ६ वरुन...

### थेरला शिवारात बिबट्याचा

प्राणी मित्र गणेश काळे यांनी घटनास्थळाला धाव घेत वनविभागाला तत्काळ कळवले. वनविभागाचे अधिकारी गुजर साहेब, पवार साहेब व देवगडे साहेब घटनास्थळी दाखल होऊन पाहणी केली. हल्ला बिबट्यानेच केला आहे का, याबाबत चौकशी सुरू करण्यात आली असून पंचनामा करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकारानंतर थेरला गावात दहशत आणि अस्वस्थता पसरली असून ग्रामस्थांनी वनविभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

### तपेनिमगाव परिसरातील

चालक परमेश्वर भानुदास शिंदे राहणार तपोनिमगाव यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील तपेनिमगाव परिसरात मागील अनेक दिवसांपासून सुप्या मागनि ट्रॅक्टरच्या साह्याने अवैध वाळू उपसा सुरू आहे, वाळू घाटाचा कोणताही लिलाव नसतांना देखील वाळु सुरू असल्याची माहिती मिळताच तलवाडा पोलीसांनी कारवाई केली आहे. वाळुच्या कारवाई पोलिस करतय तर मंडळ अधिकारी तलाठी झोपा काढायला लागले का अशा असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे तहसीलदार संदीप खोमणे साहेब चाललं तरी काय आपण लक्ष देतील का याकडे सर्वसामान्य जनतेतून मागणी आहे.

### पाटोदा एसटी महामंडळातील

शाळेतील विद्यार्थी, प्रवासी यांचे हाल होत आहेत. मोठा खर्च करून पाणपोई बांधली असूनही पाण्याची सुविधा उपलब्ध नाही. या समस्येचे निराकरण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी दखल घ्यावा आणि पाणपोई चालू करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे.

### वर्षभरात मृत्यू नोंदणीचे

महसूल विभागावर आधीच अतिवृष्टी नुकसानभरपाई, पिकविमा तक्रारी, पुरवठा विभागाची जबाबदारी, भूमापन, मालमत्ता वाद, विविध योजना यांसारखी कामे आहेत. त्यातच विलंब नोंदणीसारख्या अत्यंत संवेदनशील आणि कायदेशीर बाबींचा अतिरिक्त बोजा दिल्याने प्रशासनिक ताण वाढला आहे. याचा थेट फटका ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. दरम्यान नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरू असून, ग्रामीण भागातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या या गंभीर प्रश्नाकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी पाटोदा तालुक्यातील नागरिकांकडून तीव्र होत आहे. मृत्यूनंतरही कुटुंबियांना प्रमाणपत्रासाठी महीनोनमहिने त्रास भोगावा लागत असल्याने शासनाने ही जबाबदारी पुन्हा न्यायालयाकडे द्यावी अथवा महसूल विभागात स्वतंत्र प्रशिक्षित मनुष्यबळ नेमावे, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

### ओटीपी म्हणजे तिजोरीची चावी

जिल्ह्याचे रिजनल मॅनेजर अमित धुळे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बँकेचे शाखा व्यवस्थापक राहुल पाटील, फिल्ड ऑफिसर यशवंत पाटील, अर्णव तिवारी, कॅशियर संजू सिंग, श्री चैतन्य पत्रकार अनिल महाजन, सुनील कावळे,अवीनाश ठोंबरे,अतीक मोमीन सह शहरातील व्यापारी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. व्यापाऱ्यांनी करंट खात्यावरून जास्तीत जास्त व्यवहार करा महिलांना पैसे भरण्याची जाण असते त्यामुळे एसबीआय महिलांना व्यवसायात पुढे आणण्याचे धोरण आहे तसेच महिलांना व्याजदर देखील सूट असते त्यामुळे महिलांचे जास्तीत जास्त करंट खाते काढून घ्या तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून येणाऱ्या कुठल्याही इतरत्र लिंकला लिंक करू नका बँकेने दिलेल्या ज्या साईड आहेत अशा साईडला लिंक करा आणि स्वतः सुरक्षित रहा परिवाराला सुरक्षित ठेवा आणि देश सुरक्षित ठेवा असे पुढे बोलताना रिजनल मॅनेजर अमित धुळे यांनी व्यापाऱ्यांना सांगितले. याप्रसंगी अनेक व्यवसायिकांनी रिजनल मॅनेजर यांच्यासमोर आपला बँके संदर्भात असलेला कडू व गोड अनुभव सांगितला तसेच बँकेत येणाऱ्या अडचणी देखील यावेळी व्यापाऱ्यांकडन मांडण्यात आल्या यावेळी ग्राहकांची कसलीही गैरसोय होणार नाही याची शाश्वती रिजनल मॅनेजर धुळे यांच्याकडून व्यापाऱ्यांना देण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा तेलगाव रोड धारूर यांच्यावतीने विशेष परिश्रम घेण्यात आले

### स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या

शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी,कीट्टी आडगाव मंडळ अध्यक्षा रूपाली कचरे,पात्रुड मंडळ अध्यक्ष डॉ अभिजीत सोळंके, सत्यनारायण उनवणे,ईश्वर खुरपे, शरद कचरे,कैलास खुरपे,अनंत जगताप, बाळासाहेब क्षीरसागर,सतीश जोशी,आनंद कुलकर्णी,विनोद लड्डा,संतोष जाधव, रामेश्वर चव्हाण, धिरज अलझेंडे, बाबासाहेब जाधव, संतोष सोळंके, नामदेव मुळे, नारायण मेंडके,रवी गायकवाड यांच्यासह सर्व भाजपाचे नेतेगण पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

### धोबी समाजाच्या विविध

जातीच्या सवलती मिळण्यासंबंधाने धोबी समाज पुनर्विलोकन समिती गठित करून डी. एम. भांडे यांच्या अध्यक्षतेखाली सर्वे करण्यात आला. त्याचा अहवाल सरकारला सादर झाल्यानंतर महाराष्ट्र सरकारने सातत्याने चुकीची शिफारस केंद्राला केली. त्यामुळे परिट समाजाला न्याय मिळाला नाही. करिता योग्य शिफारस करून परीट धोबी समाजाला अनुसूचित जातीच्या सवलती पूर्ववत देण्यात याव्यात, परीट धोबी समाज व तत्सम समाजासाठी अनेक वेळा घोषणा करूनही श्री. संत गाडगेबाबा आर्थिक विकास महामंडळ कार्यान्वित झाले नाही, ते तात्काळ स्थापन करून कार्यान्वित करावे व त्याला भरीव निधी देण्यात यावा. यासह अन्य मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येत आहे.

# रक्तदान करणारे स्व.मुंडेसाहेबांच्या रक्ताच्या नात्याचे-डॉ.प्रितमताई मुंडे

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी मध्ये गेल्या पंधरा वर्षापासून स्वर्गीय मुंडे साहेबांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर हे युवा नेते संजय आंधळे घेत असून हा उपक्रम म्हणजे स्वर्गीय मुंडे साहेब यांना एक प्रकारे आदरांजली असून या रक्तदान शिबिरामध्ये रक्तदान करणारे रक्तदाते हे स्वर्गीय मुंडे साहेबांच्या रक्ताच्या नात्यातील आहेत असे आम्ही मानतो असे वडवणी येथे काल गुरुवार रोजी आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराच्या कार्यक्रमाच्या वेळी उद्घाटक म्हणून बोलताना बीड जिल्ह्याच्या नेत्या माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी विचार व्यक्त केले.

वडवणी शहरातील भारतीय जनता पार्टी कार्यालय अण्णाभाऊ साठे चौक येथे भाजपा मोर्चा युवा मोर्चा बीड जिल्हा अध्यक्ष संजय भाऊ आंधळे व स्वर्गीय लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे प्रतिष्ठान यांच्या वतीने काल गुरुवार रोजी स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले होते यावेळी या रक्तदान शिबिराचे उद्घाटक म्हणून दबंग माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून चौसाळा मतदार संघाचे माजी आमदार केशवराव आंधळे हे होते तसेच यावेळी भाजपा नेते माधवतात्या निर्मळ,भाजपा तालुका अध्यक्ष सुखदेव दादा रेडे,उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, माजी सभापती दिनकरभाऊ आंधळे,बाजार समिती उपसभापती अनिलदादा चोले, मच्छिंद्रबप्पा झाटे, विश्वनाथदादा झाटे,महादेवबप्पा रेडे,अंकुशतात्या वारे,पांडूरग अंडील, नारायण शेळके, रोहिदास खोटे, अशोक गोंडे, शिवाजी आप्पा मुंडे,मनोज पाटील, विक्रांत हजारे,यासह इतर असंख्य मान्यवर उपस्थित होते यावेळी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक या कार्यक्रमाचे संयोजक संजय भाऊ आंधळे यांनी केले तसेच यावेळी महादेव तात्या निर्मळ,माजी आमदार केशवराव



## वडवणीत भव्य शिबिरात १५१ रक्तदात्यांनी केले रक्तदान

आंधळे यांनीही मनोगत व्यक्त केले तसेच यावेळी बोलताना माजी खासदार डॉक्टर प्रितमताई मुंडे म्हणाले बीड जिल्ह्यामध्ये बीड जिल्हा वासियांचे गेल्या पन्नास वर्षापासून चे रेल्वेचे स्वप्न पूर्ण होत असून यामध्ये बीड जिल्ह्यातील रेल्वे संघर्ष समिती असतील सामाजिक कार्यकर्ते असतील यांनी रेल्वे आणण्यासाठी संघर्ष केला आंदोलन केली परंतु त्याला गती मिळण्यासाठी राजकीय पाठबळ देण्याचे काम स्वर्गीय मुंडे साहेबांनी त्याकाळी दिले त्यावेळी विरोधी पक्ष नेते असताना व तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख असताना राज्य सरकारने ५० टक्के खर्च उचलण्याचे काम मुंडे साहेबांच्या प्रयत्नामुळे झाली व त्या रेल्वेचे कामाला खरी गती त्यावेळेस पासून मिळाली व या रेल्वेच्या प्रश्नासाठी मीही दहा वर्षे खासदार असताना पाठपुरावा केला परंतु कधीही याचे श्रेय घेण्याचा मी कधीही प्रयत्न केला नाही तसेच स्वर्गीय मुंडे साहेबांच्या वाढदिवसानिमित्त व जयंतीनिमित्त संजय आंधळे हे गेल्या पंधरा वर्षापासून रक्तदान शिबिर कार्यक्रम आयोजित करतात तरी या रक्तदानाच्या कार्यक्रमातून गरजू रक्तदात्यांना रक्त मिळते व त्यामुळे एका रक्तदानामुळे पाच जणांचा जीव वाचतो तरी संजय आंधळे यांना या अगोदर कोणतेही पद नव्हते परंतु आता भाजपा युवा मोर्चाचे बीड जिल्हाध्यक्ष पद मिळालेले आहे त्यामुळे त्यांनी दरवर्षीपेक्षा यावर्षी भव्य रक्तदान शिबिराचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे तरी यापुढे यापेक्षाही मोठा कार्यक्रम त्यांनी आयोजित करावाअसे त्या म्हणाले. तरी वडवणी येथील स्वर्गीय मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या भव्य रक्तदान शिबिराचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजय भाऊ आंधळे मित्र मंडळ व स्वर्गीय लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब प्रतिष्ठान सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले यावेळी या या कार्यक्रमाला वडवणी तालुक्यातील भारतीय जनता पार्टीचे नेते,कार्यकर्ते,सरपंच,उपसरपंच,चेअरमन,सदस्य, शेतकरी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आबासो आंधळे यांनी तर आभार प्रदर्शन ईश्वर तांबडे यांनी केले.

कार्यक्रमाचे संयोजक संजय भाऊ आंधळे यांनी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या भव्य रक्तदान शिबिरामध्ये रेकॉर्ड ब्रेक तब्बल १५१ रक्तदात्यांनी रक्तदान करून उच्चार केला असून या भव्य शिबिराचे कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन नियोजन संजयभाऊ आंधळे यांनी केल्याने त्यांचे माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी कौतुक केले तसेच बीड जिल्ह्यात वडवणी येथे हा भव्य रक्तदान शिबिराचा कार्यक्रम भव्य दिव्य पार पाडला.

# हिवाळी अधिवेशनात रस्त्यावर झोपणाऱ्या आंदोलकांसाठी दिलासा

## उच्च न्यायालयाचे तात्पुरत्या निवाऱ्याचे आदेश

नागपूर । प्रतिनिधी

नागपूरमध्ये सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान कडाक्याच्या थंडीत रस्त्यावर आंदोलन करणाऱ्या विदर्भातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. रात्रीचे तापमान ८ अंश सेल्सियसपर्यंत जात असल्याने अनेक आंदोलकांना थंडीत झोपावे लागत आहे. ही बाब लक्षात घेऊन मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्वतःहून दखल घेत राज्य सरकारला आंदोलकांसाठी तात्पुरते निवारास्थळ उभारण्याचे आदेश दिले आहेत. अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीपर्यंत ही सोय उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले असून, अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्यासाठी तीन सदस्यीय समितीही नेमण्यात आली आहे.





नागपूर करारानुसार दरवर्षी डिसेंबरमध्ये हिवाळी अधिवेशन नागपूरमध्ये भरते. या काळात ग्रामीण भागातील शेतकरी, कामगार आणि सामान्य नागरिक आपल्या समस्या मांडण्यासाठी मोठ्या संख्येने शहरात येतात. मात्र, त्यांच्या राहण्याची कोणतीही ठोस व्यवस्था नसल्याने अनेकांना रस्त्यावर किंवा उघड्यावरच रात्र काढावी लागते. यंदा थंडी अधिक तीव्र असल्याने अशा परिस्थितीत नागरिकांच्या आरोग्याला आणि जीवितालाही धोका निर्माण होऊ शकतो. सरकारने याबाबत कोणतीही पूर्वतयारी न केल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. संविधानाच्या कलम २१ नुसार प्रत्येक नागरिकाला जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार आहे. त्यामुळे थंडीपासून नागरिकांचे संरक्षण करणे ही राज्य सरकारची जबाबदारी असल्याचे न्यायालयात नमूद करण्यात आले. तसेच, कलम १९ नुसार शांततापूर्ण आंदोलन करणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असून, आंदोलन करणाऱ्यांना अमानवी परिस्थितीत राहावे लागू नये, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. यावरून न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती रजनीश व्यास यांच्या खंडपीठाने स्वतःहून याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतला.

या आदेशांची अंमलबजावणी होते की नाही, यावर लक्ष ठेवण्यासाठी तीन सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीचे अध्यक्ष वकील अभिषेक भुईभर असतील. आंदोलनस्थळी येणाऱ्या नागरिकांना निवाऱ्याची योग्य सोय दिली जाते का, तसेच प्रशासनाकडून आवश्यक माहिती व मदत मिळते का, याची पाहणी ही समिती करणार आहे. समितीने सायंकाळी ४ ते ७ या वेळेत आंदोलनस्थळी भेट देऊन निरीक्षण करावे, असे न्यायालयाने सांगितले आहे.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९६२ : नासाचे मरिनर २ (चित्रीत), जगातले पहिले अवकाशयान झाले जे शुक्र ग्रहाच्या जवळुन यशस्वी रीत्या उडाले.
१९६१ : टांझानियाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.
१९४१ : दुसरे महायुद्ध – जपानने थायलँडबरोबर सहकार्याचा करार केला.
१९२९ : 'प्रभात'चा 'गोपालकृष्ण' हा चित्रपट मुंबईच्या 'मॅजेस्टिक' चित्रपटगृहात प्रदर्शित झाला.
१९०३ : किटीहॉक, नॉर्थ कॅरोलिना येथे राईट बंधूंनी उड्डाणाचा पहिला प्रयत्न केला.
१८१९ : अलाबामा हे अमेरिकेचे २२ वे राज्य बनले.


### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१९५३ : विजय अमृतराज – भारतीय लॉनटेनिसपटू
१९४६ : संजय गांधी – राजकारणी व इंदिरा गांधी यांचे पुत्र (मृत्यू: २३ जून १९८०)
१९३९ : सतीश दुभाषी – चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेते (मृत्यू: १२ सप्टेंबर १९८०)
१९३४ : श्याम बेनेगल – चित्रपट दिग्दर्शक व पटक थालेखक
१९२८ : प्रसाद सावकार – गायक व नट
१९२४ : राज कपूर – अभिनेता, निर्माता व दिग्दर्शक आणि 'द ग्रेटेस्ट शो मॅन' (मृत्यू: २ जून १९८८)
१९१८ : योगाचार्य बी. के. एस. अय्यंगार – जागतिक कीर्तीचे थोर तत्त्ववेत्ते जे. कृष्णमूर्ती यांना त्यांनी योगविद्येचे पाठ दिले.हा त्यांचा ग्रंथ जगात 'योगविद्येचे बायबल' समजला जातो.
१८९५ : जॉर्ज (सहावा) इंग्लंडचा राजा (मृत्यू: ६ फेब्रुवारी १९५२)
१५४६ : टायको ब्राहे डच खगोलशास्त्रज्ञ, खगोलशास्त्रावर मूलभूत संशोधन केले. (म्रुत्यू: २४ आक्टोबर १६०१)
१५०३ : नोट्रे डॅम – प्रसिद्ध फ्रेंच ज्योतिषी, गणितज्ञ व भविष्यवेत्ता (म्रुत्यू: २ जुलै १५६६)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९७७ : गजानन दिगंबर तथा ग. दि. माडगूळकर – गीतकार, कवी, लेखक, पटकथाकार, अभिनेते. गीतरामायणामुळे त्यांना 'महाराष्ट्राचे वाल्मिकी' म्हणून ओळखले जाते. (जन्म: १ आक्टोबर १९१९)
१९६६ : शंकरदास केसरीलाल ऊर्फ 'शैलेन्द्र' – गीतकार (जन्म: १९२३)
१७९९ : जॉर्ज वॉशिंग्टन – अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: १७३२).

# दुग्ध विकास योजनेत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा समावेश



संभाजीनगर : ग्रामीण भागातील पशुपालकांच्या आर्थिक उन्नतीसाठी दुग्ध विकास प्रकल्प टप्पा-२ राबविली जात आहे. या प्रकल्पामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा समावेश आहे. पशुपालकांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रकल्प अधिकारी डॉ. पाटील यांनी केले आहे.

विदर्भ व मराठवाड्यातील १९ जिल्ह्यांमध्ये २०२४-२५ ते २०२६-२७ या कालावधीत ही योजना राबविली जाते आहे.या योजनांचा लाभ घेण्यासाठी जास्तीत जास्त पशुपालकांनी .. या संकेतस्थळावर भेट देऊन पद्धतीने अर्ज करावे, असे आवाहन जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, छपत्रती संभाजीनगर यांनी केले आहे. तसेच योजनेसंबंधी अधिक माहितीकरिता जिल्हा प्रकल्प अधिकारी डॉ. संजीव पाटील यांना ९९७५२६९८३१ या भ्रमणध्वनीवर संपर्क करावा, असेही कळविण्यात आले आहे.

५० टक्के अनुदानावर उच्च उत्पादन क्षमता असलेली १ गाय/म्हैस वाटप. ७५ टक्के अनुदानावार उच्च उत्पादन क्षमता असलेल्या भृणांचे प्रत्यारोपण केलेली गाभण कालवड वाटप. २५ टक्के अनुदानावर प्रजनन पूरक खाद्य वाटप. २५ टक्के अनुदानावर फॅट व वर्धक खाद्य पुरवठा. ५० टक्के अनुदानावर कडबा कुट्टी यंत्र वाटप. १०० टक्के अनुदानावर बहुवार्षिक चार पिके/ ठोंबे वाटप. २५ टक्के अनुदानावर मुरघास वाटप.

# कीटकनाशकांच्या वापराबद्दल अशी घ्या खबरदारी

शेतीसाठी कीटकनाशके ही खूप महत्त्वाची आणि अविभाज्य घटक आहेत. कोणतेही पीक असले तरी त्या पिकानुसार आणि त्यावर पडणाऱ्या रोगानुसार कीटकनाशके वापरावी लागतात. कीटकनाशक कमी वापरली आणि जास्त वापरली तरीही त्याचे वेगवेगळे परिणाम पिकावर होताना दिसतात. यासोबतच, कीटकनाशके विषारी आणि मौल्यवान असल्यामुळे याचा वापर प्रमाणात होणे गरजेचे आहे. तसेच, जास्त कीटकनाशके वापरल्यानंतर तो शेतीमाल बाजारामध्ये अथवा परदेशांमध्ये विकणेही कठीण होऊन जाते. त्यामुळे कीटकनाशके वापरतांना काही खबरदारी घेणे गरजेचे आहे.

आपल्या शेतामधील पिक आणि त्या पिकावरील पडलेले अथवा संभाव्य रोग यांचा अंदाज घेऊन कोणती कीटकनाशके वापरायची हे प्रथमता ठरवणे गरजेचे आहे. जर, आपल्याला या गोष्टीमधील पूर्ण ज्ञान नसेल तर, स्थानिक तज्ज्ञ अथवा शासकीय कृषी अधिकारी यांच्याकडून मार्गदर्शन घेणे महत्त्वाचे आहे. कीटकनाशक मारण्याची योग्य वेळ आणि त्याचे प्रमाण समजून घेतले पाहिजे. कीटकनाशकांची शुद्धता दाखवण्यासाठी कीटकनाशकांच्या बाटलीवर हिरव्या निळ्या आणि पिवळ्या किंवा लाल रंगाचे चिन्ह दाखवले जाते. लाल रंगाचे चिन्ह असलेले कीटकनाशक अतिशय विषारी असून, ते सस्तन प्राण्यांवर जास्त नुकसान देतात. हिरव्या रंगाचे कीटकनाशक कमी आणि हानीकारक आहेत. कीटकनाशक खरेदी करताना त्यावर असलेली उत्पादन तारीख व एक्सपायरी डेट तारीख पाहणे अतिशय गरजेचे आहे. जर मुदत संपलेले औषध-कीटकनाशक आपण पिकांवर मारले तर, त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. यामुळे शेतकऱ्यांवर त्याचा आर्थिक परिणाम होतो. प्रत्येक कीटकनाशकांसोबत ते वापरण्याची आणि हाताळण्याची पद्धती लिहुन आलेली असते. ती काळजीपूर्वक वाचावी. किटकनाशकांची साठवणूक स्वच्छ हवेशीर आणि कोरड्या जागी करावी. कीटकनाशक फवारताना शेतकऱ्याने संपूर्ण अंग झाकेल असे कपडे घालणे गरजेचे आहे. हातामध्ये रबराचे हातमोजे, तोंडावर मास्क आणि डोळ्याच्या संरक्षणासाठी चष्मा घालणे आवश्यक आहे. फवारणीच्या वेळी जर वारा जास्त असेल तर, फवारणी करणे टाळावे. कीटकनाशके लहान मुलांच्या अथवा पाळीव प्राण्यांच्या संपर्कात येतील असे ठेवू नये.



# या ३ डाळींची खरेदी हमीभावानुसार होणार

## कृषिमंत्र्यांची संसदेत मोठी घोषणा



दिल्ली । प्रतिनिधी

डाळींचे उत्पादन वाढवण्यासाठी केंद्रातील मोदी सरकारने महत्वाचे पाऊल उचलले आहे. तूर, मसूर आणि उडीद यासारख्या प्रमुख डाळींची १००% खरेदी किमान आधारभूत किमतीवर केली जाईल अशी घोषणा केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी संसदेत केली आहे. शेतकऱ्यांची डाळ सरकार हमीभावाने खरेदी करेल आणि यामुळे डाळींच्या उत्पादनात सातत्याने वाढ होईल असा विश्वास शिवराजसिंह चौहान यांनी व्यक्त केला.

याबाबत शिवराजसिंह चौहान म्हणाले की, कर्नाटकातील एका लोकसभा सदस्याने त्यांची भेट घेतली आणि तूर खरेदीचा मुद्दा उपस्थित केला. त्यानंतर, कर्नाटक सरकारने सादर केलेल्या सर्व खरेदी प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यांनी आश्वासन दिले की कोणत्याही राज्याला तूर, मसूर आणि उडीद खरेदी करण्यात कोणतीही अडचण येणार नाही आणि मागणीनुसार मंजुरी दिली जाईल. ते पुढे म्हणाले, की किमान आधारभूत किमतीवर खरेदी राज्य संस्था किंवा केंद्राने नियुक्त केलेल्या एजन्सींद्वारे केली जाते आणि वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानाची पातळी राज्यानुसार बदलते.

मात्र तरीही शेतकऱ्यांना खरेदीमध्ये कोणत्याही अडचणी येऊ नयेत यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. तप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली सरकारने खर्चात ५०% नफा जोडून किमान आधारभूत किंमत जाहीर करण्याचे तत्व अंमलात आणले आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना चांगला भाव मिळेल. त्यांनी म्हंटल कि यापूर्वीच्या यूपीए सरकारने खर्चात ५०% नफा जोडून किमान आधारभूत किंमत देण्यास स्पष्टपणे नकार दिला होता, तर एनडीए सरकारच्या काळात, किमान आधारभूत किंमत ५०% पेक्षा जास्त नफ्याच्या फरकाने ठरवली जात आहे आणि ती मोठ्या प्रमाणात खरेदी केली जातेय. शेतकऱ्यांच्या हितासाठी आम्ही हा निर्णय घेतला असल्याचे शिवराजसिंह चौहान यांनी सांगितले.

# शाश्वत ऊस खोडवा उत्पादनाचे तंत्रज्ञान

राज्यामध्ये सर्वसाधारणपणे ४० ते ४५ टक्के क्षेत्र हे खोडव्याखाली असते. खोडवा पिकाचे उत्पादन कारखाना आणि शेतकरी या दोघांनाही आर्थिकदृष्ट्या फायद्याचे असते. खोडव्यामध्ये लागणीच्या उसापेक्षा ३५ ते ४० टक्के खर्च कमी येतो. त्यामुळे खोडव्याचे शाश्वत उत्पादन येण्यासाठी आधुनिक तंत्राचा वापर करणे खूप आवश्यक आहे.

खोडवा ठेवण्याची कारणे : पूर्वमशागतीची गरज नसल्यामुळे शेतकऱ्यांचा खर्च, वेळ आणि श्रमात मोठ्या प्रमाणात बचत होते. बेणे, बेणे प्रक्रिया व लागण खर्चात बचत होते. मुळे व डोळे तयार असल्यामुळे खोडवा चांगला फुटून एकसारखी वाढ होते. एकरी पक्व उसाची संख्या चांगली मिळते. खोडवा लागणीपेक्षा एक ते दीड महिना अगोदर पक्व होतो. पाचट आच्छादन केल्यास तण काढणी व अंतर मशागतीच्या खर्चात बचत होते. खोडवा पीक पाण्याचा ताण अधिक सहन करू शकते, त्यामुळे सिंचनाच्या पाण्यात बचत होते.बुडखा छाटणी : चांगल्या उत्पादनासाठी खोडवा ऊस डोळा जमिनीतूनच उगवणे आवश्यक असते, त्यामुळे जमिनीलगत ऊस तोडणी होणे अत्यंत आवश्यक आहे.

जमिनीच्या वर २ ते ३ कांड्या ठेवून तोडणी केल्यास खोडव्याची उगवण कमी होते. हेक्टरी उत्पादन घटते. कांडी कीड, खवले किडीचा प्रादुर्भाव झाल्यास उत्पादन मोठ्या प्रमाणावर घटते. जमिनीवर राहिलेल्या कांड्यांवरील डोळे प्रथम फुटतात, कांडीत साठलेल्या रसावर वाढतात, परंतु मुळांची वाढ न झाल्याने नंतर हे फुटवे मरून जातात. त्यामुळे ऊस तोडणी झाल्यानंतर बुडखे जमिनीलगत धारदार कोयत्याने छाटावेत, जेणेकरून उगवण जमिनीतूनच सुरू होईल. जमिनीलगत बुडखा छाटणी केल्यास फुटवे जमिनीतून उगवतात, मुळांद्वारे अन्नद्रव्ये व पाणी सहज शोषले जाऊन खोडवा चांगला वाढतो. जमिनीलगत छाटलेल्या बुडख्यावर एक लिटर पाण्यात १ ग्रॅम कार्बेन्डाझिम अधिक ०. ३६ ग्रॅम इमिडाक्लोप्रिड (७० टक्के) मिळून फवारणी करावी.



पाचट व्यवस्थापन : ऊस तुटून गेल्यानंतर शेतामध्ये राहिलेले पाचट न जाळता त्याचा शेतात आच्छादनासाठी उपयोग करावा, सर्व सऱ्यांमध्ये पाचटाचे आच्छादन करावे. वरंबे मोकळे राहतील याची काळजी घ्यावी अन्यथा फुटवे कमी फुटतात. हेक्टरी ८ ते १० टन पाचट निघते, याचा सेंद्रिय खत म्हणून चांगला उपयोग होतो. शेतामध्ये ऊस पाचट कुजविण्यासाठी हेक्टरी ८० किलो युरिया, १०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट व २. ५ लिटर पाचट कुजविणारे द्रवरूप जिवाणू संवर्धक वापरावे.

खोडव्यामध्ये पाचट आच्छादन : मातीमध्ये सेंद्रिय कर्ब वाढून मातीची सुपीकता आणि उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होते. मातीचा पोत सुधारतो, पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते. मातीमध्ये उपयुक्त सूक्ष्म जिवाणूंची संख्या वाढते. रासायनिक खतांची कार्यक्षमता वाढून, वापरामध्ये बचत होते. तण व बाष्पीभवनावर नियंत्रण होते. पर्यावरणपूरक व शाश्वत ऊस शेतीला चालना मिळते.

बगला फोडणे : पहिल्या पिकाची मुळे जुनी व जीर्ण झालेले असल्यामुळे ती अकार्यक्षम झालेली असतात. जुनी मुळे तोडण्यासाठी तसेच जमीन भुसभुशीत होऊन हवा खेळती राहण्यासाठी ऊस तुटून गेल्यानंतर ८ ते १० दिवसात बगला फोडाव्यात. बुडखा छाटल्यानंतर जमीन वापश्यावर असताना किंवा हलकी, मध्यम जमीन जास्त कोरडी असल्यास हलकेसे पाणी देऊन नांगरणे बगला फोडून घ्याव्यात. बगला फोडल्यामुळे जुनी मुळे तुटून नवीन मुळांच्या संख्येत चांगली वाढ होते. ही मुळे फार कार्यक्षम असतात. नवीन मुळे जमिनीतील अन्नद्रव्य व पाणी शोषून घेऊन फुटव्यांच्या जोमदार वाढीसाठी मदत करतात. जमीन ६ ते ७ दिवस उन्हात तापू द्यावी. त्यानंतर वरखते देऊन दातेरी कुळव चालवावा, यामुळे खते मातीत मिसळतात आणि नंतर पाणी द्यावे. पारंपरिक लागण पद्धतीमध्ये पाचट आच्छादन करून रिकाम्या राहिलेल्या एक आड एक सरीमधील बगला अंकुश नांगराने फोडाव्यात.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
रविवार दि.१४ डिसेंबर २०२५ ५

# पोलीस महानिरिक्षक वीरेंद्र मिश्र यांच्या हस्ते १६० संगणक संच वाटप

जालना। प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र, पोलीस महानिरीक्षक श्री वीरेंद्र मिश्र हे आज जालना येथे आले असता त्यांनी पोलीस प्रशासनामध्ये विविध विषयावर बैठकीचे आयोजन केले होते १२.१२.२०२५ रोजी मा.श्री. वीरेंद्र मिश्र विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र यांनी जालना जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी तसेच सर्व शाखा प्रमुख यांची पोलीस अधीक्षक कार्यालय जालना येथे गुन्हे आढावा परिषद घेतली. सर्वप्रथम सदर परिषदेमध्ये मा.श्री. वीरेंद्र मिश्र, विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या हस्ते जिल्हा नियोजन समिती येथुन मिळालेल्या एक कोटी सत्तावन लाखाचा या अनुदानातुन ३० झेरॉक्स मशिन, ६० संगणक संच, ६० प्रिंटर व १० लॅपटॉपचे जालना जिल्हयातील पोलीस ठाणे व उप विभागीय पोलीस अधिकारी यांचे कार्यालय तसेच पोलीस अधीक्षक कार्यालय येथील शाखेस वाटप करण्यात आले. यावेळी पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल,



अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांचीही उपस्थिती होती.

त्यांनतर माहे ११/२०२५ मध्ये उल्लेखनिय कामगीरी करणाऱ्या पोलीस अधिकारी / अंमलदार यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. सदर गुन्हे परिषदेमध्ये खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, मोटारसायकल चोरी, चारचाकी चोरी व इतर प्रलंबित गुन्हयांचा आढावा घेऊन सदरील गुन्हे लवकरात लवकर निकाली काढण्यासंदर्भाने महत्वाच्या सुचना दिल्या. तसेच सर्व प्रभारी अधिकारी यांनी पुढील काळात अमली पदार्थाबाबत जास्तीत जास्त दर्जेदार कारवाया करण्याच्या सुचना दिल्या.

उपविभागीय पोलीस अधिकारी व प्रभारी अधिकारी यांनी जास्तीत जास्त गावभेटी द्याव्यात व प्रत्येक गावात सिसिटीव्ही कॅमेरा लावणे बाबत जनजागृती करावी व नविन कायद्याची अंमलबजावणी करुन दोषसिध्दीचे प्रमाण वाढविणेबाबत सुचना दिल्या आहेत. तसेच आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी व उप विभागीय पोलीस अधिकारी यांना शरीराविरुध्द व मालाविरुध्द च्या गुन्हयातील दोन पेक्षा जास्त गुन्हे दाखल असलेल्या आरोपीतांवर प्रतिबंधक कारवाई करण्याच्या व अवैध धंद्याच्या दर्जेदार कारवाया करण्याच्या सुचना केल्या आहेत. मा. विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या गुन्हे आढावा परिषदेमध्ये मा. अजयकुमार बंसल पोलीस अधीक्षक जालना, मा. आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक जालना तसेच जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व सर्व शाखा प्रमुख हे पोलीस अधीक्षक कार्यालय येथे हजर होते.

# अल्पवयीन मुलीस गाडीतून पळवणारा आरोपी गोव्याहून जेरबंद

## नगर तालुका पोलिसांची दमदार कारवाई

अहिल्यानगर। प्रतिनिधी

नगर तालुक्यातील पोलिस स्टेशन गुन्हा रजि. नंबर १०२८/२०२५ भा.दं.वि. १३७(२) दाखल गुन्ह्यातील फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी हीस रात्री आरोपी नामे प्रतीक संजय मुरमकर (रा. आष्टी, जिल्हा बीड) याने लग्नाचे आमिष दाखवून झायलो गाडीतून पळून नेले होते.घटनेनंतर आरोपीने प्रथम अल्पवयीन मुलीच्या घरापासून गाडीतून पळवून नेऊन येथील टोल नाक्याच्या कॅमेऱ्यामध्ये गाडी दिसू नये म्हणून सदरील झायलो गाडी ही राहुरी येथील नातेवाईकांकडे लावली. त्यानंतर त्याने आपला पुढील प्रवास कोल्हापूरमार्गे थेट गोव्याकडे केला.

गोवा येथे तो एका मित्राच्या मदतीने खोली घेऊन राहू लागला. दरम्यान, आरोपीचा तांत्रिक विश्लेषणाद्वारे शोध घेण्यात आला आणि त्याच्या हालचालींचा बारकाईने मागोवा घेत पोलिसांनी त्यास ताब्यात घेतले.सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी नगर ग्रामीण विभाग शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

नगर तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अंमलदार आबासाहेब झावरे, नितीन शिंदे, राजू खेडकर, सचिन मस्के तसेच दक्षिण मोबाईल सेल विभागाचे अंमलदार राहुल गुंडू यांनी ही कारवाई केली.

पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक उमेश पतंगे हे करीत आहेत.पोलीस पथकाने आरोपीस जेरबंद करून अल्पवयीन मुलगी सुरक्षितरित्या परत मिळविण्यात मोठे यश मिळविले असून या संपूर्ण कारवाईत नगर तालुका पोलिसांनी निर्णायक आणि महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. नगर तालुका पोलिसांच्या या वेगवान, तांत्रिक आणि प्रभावी तपासाची सर्वत्र प्रशंसा होत आहे

# मसाजच्या नावाखाली वेश्या व्यवसाय चालवणाऱ्या नगरमधील वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश

अहिल्यानगर। प्रतिनिधी

मसाजच्या नावाखाली वेश्या व्यवसाय चालवणाऱ्या 'अँक्यूम मसाज' पार्लरवर अनैतिक मानवी वाहतूक व व्यापार प्रतिबंधक कक्षाच्या पोलिसांनी छापा टाकला. कारवाईत ५ पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे. स्पा मॅनेजर अनिकेत अशोक बचाटे आणि ग्राहक महेश सुंदराणी यांना ताब्यात घेतले.

ही कारवाई नगर-मनमाड रस्त्यालगत असलेल्या 'अँक्यूम मसाज पार्लरवर ११ डिसेंबर रोजी दुपारी करण्यात आली. अनैतिक मानवी वाहतूक व व्यापार प्रतिबंधक कक्षाच्या पोलीस निरीक्षक पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुखयांना या स्पामध्ये मसाजच्या आडून बेकायदेशीर



वेश्या व्यवसाय सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीनंतर पोलिसांनी नियोजन करून एक बनावट ग्राहक स्पामध्ये पाठवला. बनावट ग्राहकाने सांकेतिक भाषेत संदेश दिल्यानंतर पोलिस पथकाने तात्काळ स्पावर छापा टाकला. छाप्यादरम्यान स्पामध्ये ५ महिलांना जबरदस्तीने या व्यवसायात राबवले जात असल्याचे आढळून आले. स्पा मॅनेजर ग्राहकांकडून पैसे घेऊन त्यातील निम्मी रक्कम स्वतःकडे ठेवत असल्याचे तपासात समोर आले आहे. पीडित महिलांची तत्काळ सुटका करून त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. या कारवाईमुळे स्पा सेंटरच्या नावाखाली चालणाऱ्या अवैध धंद्यांवर अंकुश बसणार असून, पोलीस अधीक्षक कार्यालयाने अशा अनैतिक मानवी वाहतुकीच्या विरोधात कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

# महानगरपालिका निवडणूक साठी भाजपकडून पहिल्याच दिवशी ३०७ फॉर्म वाटप-भास्कर दानवे

जालना। प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी, जालना महानगरतर्फे आगामी जालना महानगरपालिका निवडणूक २०२५-२६ करिता इच्छुक उमेदवारांकडून अर्ज विक्री करण्याची प्रक्रिया आज दिनांक १२ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वा भाजपा जिल्हा कार्यालयात सुरू करण्यात आली. अर्ज वितरणाच्या पहिल्याच दिवशी पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून आज पहिल्याच दिवशी एकूण ३०७ इच्छुक उमेदवारी फॉर्म चे वाटप करण्यात आले. या प्रसंगी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्यासह राजेशजी राऊत, अशोक अण्णा पांगारकर,



विजय कामड, विमलताई आगलावे, शुभांगीताई देशपांडे, अरुणा जाधव इत्यादी प्रमुख मान्यवरांची उपस्थिती होती.

या वेळी जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, जालना महानगरपालिकेची आगामी निवडणूक असून भाजपाचा प्रत्येक कार्यकर्ता आणि पदाधिकारी उत्साहाने सहभागी होत आहे. शहराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि जनतेच्या अपेक्षांना प्राधान्य देणारे सक्षम उमेदवार देण्याचा भाजपा महानगराचा संकल्प आहे. अर्ज वितरणास मिळालेला आजचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता पक्ष संघटनेची भक्कम ताकद आणि जनतेचा भाजपावरील विश्वास अधिक दृढ असल्याचे दिसून येते. जालना शहराचा विकास हा भाजपाचा केंद्रबिंदू मानून शहराच्या पुढील पाच वर्षांच्या विकासाचा अजेंडा तयार करून जालना महानगरपालिकेतील जनतेच्या दैनंदिन समस्या वीज, पाणी, स्वच्छता व सुंदर रस्ते याला प्राधान्य देणारी असेल व हे मुद्दे घेऊन आम्ही जनतेसमोर जाणार असून जनता निश्चितच या मुद्द्यामुळे भारतीय जनता पार्टीच्या पाठीसी उभी राहून जालना महानगरपालिकेत भाजपा चे मोठ्या संख्येने उमेदवार निवडून देतील असा मला पूर्ण विश्वास आहे, असे त्यांनी सांगितले.

# रोजगार हमी प्रश्नावर पूर्णा येथील शेतकऱ्यांचे नागपूर विधानभवनासमोर आमरण उपोषण सुरू

पूर्णा। प्रतिनिधी

मनरेगा व विविध शासकीय योजनांमधील अडचणींमुळे त्रस्त झालेल्या पांगरा (पूर्णा) तसेच इतर गावांमधील शेतकऱ्यांनी थेट नागपूर गाठत हिवाळी अधिवेशनादरम्यान विधानभवनासमोर १२ डिसेंबरपासून आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. उपोषणकर्त्यांमध्ये बाबाराव ढोणे, विकास जाधव, मधूकर कांबळे, नारायण लोखंडे यांसह इतर शेतकऱ्यांचा समावेश आहे.

राज्यात गेल्या काही दिवसांपासून मनरेगा योजनांच्या अंमलबजावणीत गंभीर अडथळे निर्माण झाले आहेत. अनेक गावांमध्ये मंजूर कामांना प्रत्यक्ष सुरूवातच झालेली नाही. एका गावात वीसपेक्षा जास्त वैयक्तिक कामांना मंजुरी न दिल्याने अनेक शेतकरी अपुऱ्या कामांमुळे अडकून पडले



आहेत. तांत्रिक प्रक्रिया, चुकीची धोरणे आणि प्रशासकीय दिरंगाई यामुळे लाखो मजुरांना रोजगार हमीचा लाभ मिळणे कठीण झाले असून, शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. या सर्व समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी मनरेगातील ''२० कामांच्या मर्यादेचा'' अडथळा तातडीने दूर करावा, या प्रमुख मागणीसह शेतकरी यशवंत स्टेडियम परिसरात आमरण उपोषण करत आहेत.शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या : जॉबकार्ड लाभार्थ्यांसाठी ७ लाख रुपयांची मर्यादा वाढवावी. थांबलेली सर्व मनरेगा कामे तातडीने सुरू करण्याबाबत जिल्हाधिकारी व सीईओ जिल्हा परिषद यांना आदेश द्यावेत. तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात दिरंगाई करणाऱ्या अधिकारीकर्मचाऱ्यांवर शिस्तभंग कारवाई. लाभार्थ्यांचे मस्टर झिरो करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई. मनरेगातील वैयक्तिक कामांवरील ''२० कामांचा लॉक'' तात्काळ रद्द करावा. मराठवाड्यातील गटविकास अधिकारी व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या अनियमितता, भ्रष्टाचार व दिरंगाईची चौकशी करून कारवाई. सिंचन विहीर, गाय-गोठा, कुशल मनुष्यबळ आदी अनुदानाच्या रकमा तातडीने वितरीत कराव्यात. शेतकऱ्यांचे अर्ज ''मस्टर झिरो/अर्ज झिरो'' करण्याच्या गैरप्रकारांवर तत्काळ कार्यवाही गटविकास अधिकाऱ्यांनी घेतलेल्या कथित बेकायदेशीर सामूहिक रजेची विभागीय चौकशी. गावपातळीवरील वाढत्या वन्यप्राणी उपद्रवावर तातडीने बंदोबस्त. घरकुल लाभार्थ्यांना थकलेले अनुदान तातडीने देण्यात यावे.

# सोयाबीन खरेदीत डागीची मर्यादा १० टक्क्यांपर्यंत वाढवा

## आ.केराम यांची पणनमंत्र्यांकडे मागणी

किनवट

नाफेड अंतर्गत सुरू असलेल्या सोयाबीन हमीभाव खरेदीमध्ये सध्या लागू असलेली केवळ २ टक्के डागीची मर्यादा वाढवून ती १० टक्के करावी, अशी मागणी किनवटमाहूरचे आमदार भीमराव केराम यांनी राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, किनवटमाहूर हे डोंगराळ व दुर्गम तालुके असून यंदाच्या खरीप हंगामात सुमारे ५४ दिवस सतत पावसाची नोंद झाली. अतिवृष्टी व असामान्य हवामानामुळे सोयाबीन पिकात डागीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून, त्यामुळे शेतकऱ्यांचा माल व्यापारी दर्जात बसत नाही. सध्याच्या नियमांनुसार २ टक्क्यांपेक्षा जास्त डागी असलेला माल खरेदीस अपात्र ठरत असल्याने अनेक शेतकऱ्यांना खरेदी केंद्रावरून माल परत न्यावा लागत आहे. यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक ताण वाढत असून, त्यांना हमीभावाचा प्रत्यक्ष लाभ मिळत नाही, अशी वस्तुस्थिती आमदार केराम यांनी मांडली आहे. नैसर्गिक आपत्तीचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांनाच बसला असून, वाढलेल्या डागी प्रमाणामुळे हजारो



शेतकरी हमीभावापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे बिकट अवस्थेतील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सध्याची २ टक्के मर्यादा वाढवून किमान १० टक्के डागी सोयाबीन खरेदीस परवानगी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. या मागणीची सहानुभूतीपूर्वक दखल घेऊन नियमांत शिथिलता आणल्यास आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

# सिल्लोड जिल्हा उपजिल्हा रुग्णालय राज्यात प्रथम

सिल्लोड । प्रतिनिधी

ागील तीन दशकांपासून आरोग्यसेवा उभारणीची नवी परंपरा निर्माण करणाऱ्या सिल्लोड उपजिल्हा रुग्णालयाने यावर्षी पुन्हा एकदा राज्यभरात आपला दबदबा सिद्ध करत डायलिसिस सेवा आणि प्रसूती (मातृत्व) सेवा या दोन्ही विभागांमध्ये राज्यात प्रथम क्रमांक पटकावण्याचा मान मिळविला आहे.

आरोग्य मुख्य सचिव, उपसचिव, आरोग्य संचालक यांनी घेतलेल्या व्हिडिओ कॉन्फरन्समधून सिल्लोड उपजिल्हा रुग्णालयाच्या कामगिरीचे विशेष कौतुक करत अधीक्षक डॉ.महेश विसपुते आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले. सिल्लोड उपजिल्हा रुग्णालयात ट्रॉमा केअर, नेत्रभिंगारोपण शस्त्रक्रिया, लेसर तंत्रज्ञान, रक्तपेढी आणि पुरेशा ऑक्सिजन सुविधांसह आधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध आहे. यावर्षीच १ लाख ६७ हजार १९८ रुग्णांवर तपासणी व उपचार तर २ हजार



२९९ नॉर्मल प्रसूती, ५१ सिझेरियन, तसेच ६२० नेत्रभिंगारोपण शस्त्रक्रिया पार पडल्या. कॅज्युअल्टी व ट्रॉमा विभागातून रेफर केलेल्या सर्वच रुग्णांना पुढील उपचार वेळेत मिळाल्याची माहिती अधीक्षकांनी दिली. डायलिसिस तज्ञ डॉ.भालचंद्र बडे व डॉ.भाग्यश्री अमृते आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या टीमने अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या डायलिसिस मशीनद्वारे रुग्णांना सुरक्षित, स्वच्छ व किफायतशीर उपचार उपलब्ध करून दिले. वेळेवर होणाऱ्या उपचारांमुळे मूत्रपिंड विकारग्रस्त रुग्णांना दिलासा मिळतो. अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखालील तज्ज्ञ डॉक्टरांची ट्रॉमा टीम हेड इन्जुरी, फॅक्चर व इतर गंभीर अपघाती घटनांमध्ये तातडीची आणि अचूक सेवा देत आहे. मागील वर्षी कॅज्युअल्टीत ३४०, तर ट्रॉमा युनिटमध्ये १२६ याप्रमाणे ४६६ रुग्णांवर उपचार करण्यात आले. रुग्णालयात ५ व्हेंटिलेटर उपलब्ध आहेत; मात्र गंभीर हार्ट अटॅक व इतर क्रिटिकल केसमध्ये एमडी मेडिसीन तज्ञ डॉक्टर नसल्यामुळे रुग्णांना रेफर करावे लागते. व्हेंटिलेटरच्या पूर्ण क्षमतेने उपयोगासाठी एमडी मेडिसीन तज्ञ डॉक्टर नेमणुकीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविल्याचे अधीक्षक डॉ.महेश विसपुते यांनी स्पष्ट केले. सिल्लोड तालुक्याला लागून असलेल्या बुलढाणा जिल्ह्यासह खानदेशमधील जामनेर, जालना जिल्ह्यातील भोकरदन व जाफराबाद, तसेच सोयगाव, फुलंबी, खुलताबाद, कन्नड या तालुक्यांतील नागरिक मोठ्या प्रमाणात आरोग्यसेवेसाठी सिल्लोडमध्ये येतात. आधुनिक सुविधा, प्रशिक्षित स्टाफ आणि अतिदक्षता सेवांमुळे रुग्णालयावर जनतेचा विश्वास सातत्याने वाढत आहे.

# बाळाचे लसीकरण सुरू असताना आशा वर्करला मारहाण

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

लहान बाळांचे लसीकरण सुरू असताना एका महिलेने तिच्या बाळाला पाच पैकी दोनच डोस घेतल्यानंतर नकार देत आशा वर्करला शिवीगाळ करून मारहाण केली. ही घटना मंगळवारी (दि.९) दुपारी दीडच्या सुमारास साहस सोसायटी येथील अष्टविनायक मंदिरात घडली. शालिनी विकास रोकडे (रा. साईनगर) असे मारहाण करणाऱ्या महिलेचे नाव आहे.





फिर्यादी आशा वर्कर पूजा रुपेश दहिटे (३०, रा. विजयनगर) यांच्या तक्रारीनुसार, विजय नगर येथील साहस सोसायटीमध्ये लहान बाळांना लसीकरण सुरू होते. तिथे आरोपी शालिनी रोकडे तिच्या चार महिन्यांच्या बाळाला घेऊन आली. बाळाला पाच लास द्यायचे होते. त्यातील दोन लस तोंडातून पाजायचे तर तीन टोचायचे होते. शालिनीने दोन तोंडातून पाजायचे व एक टोचायची लस तिच्या बाळाला घेतली. पुढील डोस घेण्यास नकार दिला. तिला सिस्टर अर्चना राठोड यांनी समजून सांगण्याचा प्रयत्न केला. बाळाच्या आरोग्यासाठी चांगले असतात असे सांगण्याचा प्रयत्न केला.तिने राठोड यांना तुम्ही जास्त बोलू नका मला माझ्या बाळाला लस द्यायची नाही असे म्हणत मारहाणीची धमकी दिली. त्यानंतर पूजा दोन लस न दिल्याने लसीकरण कार्डवरील तारीख कट करत असताना शालिनीने त्यांच्या पाठीमागून येथून केस पकडून मारहाण केली. पूजा यांच्या सोबतच्या आशा वर्कर यांनी तिच्या तावडीतून पूजा यांना सोडविले. मात्र, त्यानंतरही शालिनी शिवीगाळ करून निघून गेली. या प्रकारामुळे आशा वर्कर पूजा यांनी लसीकरणाच्या शासकीय कामात शालिनी रोकडे हिने अडथळा आणून ते बंद पाडले अशी तक्रार दिली. त्यावरून पुंडलिकनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# केंद्राचे पथक चक्रावले; जलजीवनचे कामे अर्धवट मात्र अधिकाऱ्यांचा शेरा समाधानकारक

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यामध्ये कोट्यावधी रुपयाचे जलजीवन मशीन अंतर्गत कामे करण्यात आली ज्याठिकाणची कामे पूर्ण झाली आहेत असे अहवाल अधिकाऱ्याने दिले आणि कंत्राटदारांना पैसेही दिले मात्र या कामाची तपासणी करण्यासाठी आलेल्या केंद्रीय पथकाला अनेक ठिकाणी कामे रखडलेली आढळली मात्र संबंधित कंत्राटदाराच्या फाईलवर स्थानिक अधिकाऱ्यांनी कामे समाधानकारक असल्याच्या शिरा मारून पूर्ण काम न करताच बिले उचलल्याचे समोर आल्यामुळे केंद्रीय समिती देखील चक्रावून गेली आहे.**



केंद्र शासनाच्या माध्यमातून राज्यभरामध्ये जलजीवन योजना राबविण्यात आली या पेजल योजनेअंतर्गत प्रत्येक कुटुंबाला पाणी ही योजना केंद्राची महत्त्वकांक्षी असल्याने तिला प्राधान्य देण्यात आले प्रामुख्याने बीड जिल्ह्यामध्ये प्रत्येक गावात सर्वे करून कामे दिली गेली संबंधित कंपनीने काम पूर्ण करायचे त्याची देखरेख करण्यासाठी अन्य समिती ही नेमलेत आली होती मात्र कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा आणि संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांनी कंत्राट बारांना अधिकाऱ्यांनी हाताशी धरून न झालेल्या कामाचे बिले उचलले त्यामुळे अनेक ठिकाणी कामे रखडले आहेत ही परिस्थिती सत्य असताना देखील त्यावर पांघरून घालण्याचे काम काही अधिकारी करत असल्याचे बोलले जात आहे केंद्रामधून आलेल्या समितीने जिल्हा परिषदेकडून जलजीवन योजना पूर्ण झालेल्या गावांची यादी घेत प्रत्यक्ष तपासणी केली मात्र प्रत्यक्ष तपासणी करताना अनेक बाबी केंद्रीय पथकाच्या निदर्शनास आले अनेक ठिकाणी कामे अर्धवट आहेत तर काही ठिकाणी केवळ पाईप लाईन केली आहे पाण्याचा पत्ता नाही योजना मंजूर करताना पाण्याचा स्रोत पाहणे गरजेचे असताना ते न पाहता जलकुंभ उभा केले केले यासोबतच काही ठिकाणी जलकुंभ आणि पाण्याचे स्त्रोत आहेत परंतु अद्याप वीजपुरवठास नसल्याने गावकऱ्यांना पाणी मिळत नाही आणि स्थानिक अधिकाऱ्यांनी मात्र उत्कृष्ट समाधानकारक असे सेरे मारून कंत्राटदाराचे आणि स्वतःचे भले केल्याचे दिसून येत आहे तर अनेक ठिकाणी नागरिक या समितीला कामे अर्धवट असल्याच्या आणि गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी देत आहेत त्यावरही पांघरून घालण्याचे काम काही अधिकारी करत आहेत.

## कंत्राटदार अधिकाऱ्यांची मिली भगत

कुठे होती रुपये खर्च करून ग्रामीण भागातील महिलांची पिण्याच्या पाण्यासाठी होणारी पायपीट थांबवण्यासाठी केंद्र सरकारने सुरू केलेल्या योजनेचा बीड जिल्ह्यात अधिकारी आणि कंत्राटदारांनी बट्ट्याबोळ करून टाकला आहे विशेषता अर्धवट कामे असतानाही उत्कृष्ट काम म्हणून शहरात येत कंत्राटदारांना दिले गेली मात्र आता संबंधित कंत्राटदार आणि संबंधित अधिकारी यांच्यावर काम पूर्ण करण्याची जबाबदारी वरिष्ठांनी टाकावी अशी ही मागणी होत आहे.



**आष्टी : शहरातील पिंपळेश्वर मंदीरात ११ जोडप्यांनी सलग सहा तास माता पार्वतीच्या मुर्ती प्राणप्रतिष्ठेची पूजा केली. यावेळी शहरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते, पूजा संपन्न झाल्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.**

# थेरला शिवारात बिबट्याचा धुमाकूळ; हरीण ठार, ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील थेरला शिवारात बुधवारी (दि. ११ डिसेंबर २०२५) रात्री बिबट्याचा थैमान पाहायला मिळाले. गावालगतच्या शेताजवळ बिबट्याने एक हरीण ठार करून अर्धवट अवस्थेत सोडून दिल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



रस्त्याच्या कडेला अर्धवट खाल्लेल्या अवस्थेत हरीण आढळून आल्यानंतर गावकऱ्यांना घटनेची माहिती झाली. "जर प्राण्यांवर हल्ला होत असेल तर माणसांवरही धोका संभवतो," अशी भीती ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी सध्या रानात जाणे टाळण्यास सुरुवात केली आहे. बिबट्या आपल्या शिकारीकडे परत येऊ शकतो, अशी दहशत देखील स्थानिकांमध्ये पसरली आहे. ही घटना शेतकरी रामराव राख यांच्या वाड्याजवळ घडली असून मृत हरणाजवळ बिबट्याचे अस्तित्व स्पष्ट दिसून येत आहे. घटनेची माहिती मिळताच ◀◀ पान ३ वर

# तपेनिमगाव परिसरातील अवैध वाळू उपशावर तलवाडा पोलिसांची कारवाई



## एक ट्रॅक्टर असा सहा लाख पाच हजार मुद्देमाल जप्त

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तत्ववाडा पोलिस ठाणे हदीतील तपेनिमगाव परिसरात छुप्या मार्गाने के निच्या सहाय्याने अवैध वाळू उपसा होत असल्याची गुपनिय माहिती तलवाडा पोलिसांना मिळताच त्यांनी या अवैध वाळू उपश्यावर दि.१२ रोजी सकाळी नऊ वाजता दत बाग शिवारात धाड टाकली यामध्ये एक ट्रॅक्टर पकडण्यात आला आहे. साहा लाख पाच हजार रुपयेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. कारवाई पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत ,अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पाडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी अनिल कटके, तलवाडा पोलीस स्टेशनचे सपोनि मनोज निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक कैलास अन्नादास, गोपनीय शाखेचे विठ्ठल राठोड , यांनी कामगिरी केली आहे.

असून याप्रकरणी तलवाडा पोलिस ठाण्यात ◀◀ पान ३ वर



**आष्टी : तालुका पत्रकार संघाचे सचिव शरद रेडेकर यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करताना मित्र परिवार व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते अण्णासाहेब चौधरी तात्या व आष्टी तालुका पत्रकार संघाचे सर्व सदस्य .**

# डॉ.सय्यद वलीयुद्दीन यांची बंगळुरू येथे एमडी बालरोगसाठी निवड

आष्टी । प्रतिनिधी



आष्टी तालुक्यातील चिंचाळा येथील रहिवासी आणि प्रसिद्ध कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांचे चिरंजीव डॉ.सय्यद वलीयुद्दीन यांची कर्नाटकातील बंगळूरू येथील प्रतिष्ठित महाविद्यालयात एमडी बालरोग अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे.डॉ.सय्यद वलीयुद्दीन यांचे बीएएमएसचे पूर्ण शिक्षण संगमनेर सिद्धकला आयुर्वेद महाविद्यालयात विशेष प्राविण्यासह पूर्ण झाले आहे.प्राथमिक ते एच.एस.सी.पर्यंतचे शिक्षण जिल्हा परिषद नंबर ०१,गंगुबाई आनंदराव धोंडे विद्यालय,पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय,श्री गणेश विद्यालय,एडवोकेट बी.डी.हंबर्डे महाविद्यालयात पूर्ण झाले आहे.आष्टी येथील दंतचिकित्सक डॉ.सय्यद हुमायुद्दीन यांचे ते लहान बंधू आहेत. या यशाबद्दल डॉ.सय्यद वलीयुद्दीन यांचे आ.सुरेश आण्णा धस,माजी आ.भीमराव धोंडे साहेब,माजी आ.साहेबराव दरेकर नाना,माजी आ.बाळासाहेब आजबे काका,संस्थाध्यक्ष किशोर नाना हंबर्डे,सचिव अतुल शेठ मेहेर, प्राचार्य डॉ.सोपानराव निंबोरे,चिंचाळ्याचे सरपंच पंडित पोकळे,जालिंदर पोकळे,दिगंबर पोकळे,गणपत पोकळे पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# अशा माथेफिरूचा बंदोबस्त होणे गरजेचे नसता शहरांमध्ये अनर्थ झाल्याशिवाय राहणार नाही

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी शहरांमध्ये गेल्या वर्षापासून कर्नाटक राज्यातील एक माथेफीरू युवक राजरोसपणे फिरत आहे तो महिलांवर वृद्धांवर हल्ले देखील करत आहे. शुक्रवारी आष्टी शहरातील किनारा चौकातील जिल्हा परिषद शाळा मुलांची या ठिकाणी बिवो कार्यालयातील महिला शिपाई यांच्यावर याने हल्ला केला त्याची केसे थरून रस्त्यावर पाडले यामध्ये या सुदैवाने बचावल्या मात्र या प्रकरणी पोलिसांना तक्रार केली असता ते म्हणाले हे नगरपंचायतचे काम आहे असे प्रकार मागे देखील अनेक झाले आहेत



तरी पोलीस प्रशासनाला वेळोवेळी सूचित करून देखील ते बोलतात ते आमचे काम नाही ते नगरपंचायतचे काम आहे मग आता हिंसक पद्धतीचा माथे फीरु वेडसर मुलगा एखाद्या दिवशी मोठा अनर्थ झाल्या शिवाय राहणार नाही तर मागच्या सहा महिन्यापूर्वी शनी चौकातील शनी मंदिरातील दानपेटी देखील येणे चोरण्याचा प्रकार केला होता. त्यामुळे वेळीच या माथे पेरूचा बंदोबस्त करणे हे गरजेचे आहे तरी पोलीस प्रशासनाने व नगरपंचायतने याची दखल घेऊन या माथेफिरूला लवकरच येरवड्याला पाठवले पाहिजे अशी नागरिकांतून मागणी होत आहे.



# पाटोदा एसटी महामंडळातील पाणपोई उद्घाटन झाल्यापासून बंद

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा एसटी महामंडळातील पाणपोई उद्घाटन झाल्यापासून बंद पडली आहे. एका सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रवाशांच्या सोयीसाठी पाणपोई बांधली असून उद्घाटन झाल्यापासून अजूनही बंदच आहे.

पाणी नसल्यामुळे शाळेतील विद्यार्थी प्रवासी यांचे हाल पाणी नसल्यामुळे ◀◀ पान ३ वर

# वर्षभरात मृत्यू नोंदणीचे तब्बल १७ आदेश नाकारले, मृत्यूनंतरही सर्वसामान्यांच्या यातना थांबेनात

पाटोदा । प्रतिनिधी

जन्ममृत्यू विलंब नोंदणीचे अधिकार न्यायालयाकडून महसूल विभागाकडे दिल्यापासून सर्वसामान्य नागरिकांच्या यातना प्रचंड वाढल्या आहेत. पूर्वी न्यायालयात प्रक्रिया कायदेशीर अधिष्ठानासह जलदगतीने पार पडत असताना, महसूल विभागाकडे अधिकार गेल्यापासून ग्रामीण भागातील नागरिकांना तहसील कार्यालयांची वारंवार पायपीट करावी लागत आहे. तांत्रिक कौशल्य, कायदेशीर प्रशिक्षण आणि तज्ज्ञ मनुष्यबळाच्या अभावामुळे प्रकरणे महिनोनमहिने रखडत असून नागरिकांचे हाल अधिकच तीव्र झाले आहेत.

## घरी मृत्यू झाल्यानंतर पोस्टमार्टम रिपोर्ट कुठून आणायचा सर्वसामान्य नागरिकांचा सवाल

पाटोदा तालुक्यातील परिस्थिती विशेषतः गंभीर असून फक्त वर्षभरात मृत्यू नोंदणीसाठी आलेल्या अर्जांपैकी तब्बल १७ प्रकरणे प्रशासनाकडून नाकारली गेली आहेत, तर केवळ ५ आदेशच मंजूर झाले आहेत. त्यापैकीही काही मंजूर प्रकरणे आत्महत्येसारख्या गंभीर कारणांमुळे आवश्यक कागदपत्रे उपलब्ध झाल्यानेच पारित झाली आहेत. बाकीच्या सर्वसामान्य नागरिकांना मात्र आवश्यक पुरावे उपलब्ध न झाल्याने अथवा प्रक्रिया न समजल्यामुळे आदेश नाकारले जात आहेत. शासनाने विलंब नोंदणीसाठी निश्चित केलेली कागदपत्रे नागरिकांना सहज उपलब्ध होत नाहीत. विशेषत: गरीब कुटुंबात मृत्यू झाल्यास पोस्टमार्टम रिपोर्ट कुठून आणायचा? कोणत्या कागदाची गरज आहे? प्रक्रिया कोणाकडे विचारावी? असे प्रश्न नागरिकांमध्ये निर्माण झाले आहेत. तहसील कार्यालयात या प्रक्रियेसाठी मार्गदर्शन करण्यासाठी स्वतंत्र कर्मचारी नसल्याने अर्जदारांना अपूर्ण माहिती, वारंवार फेऱ्या आणि प्रलंबित फाईल्स यांचा सामना करावा लागतो. ◀◀ पान ३ वर

# धोबी समाजाच्या विविध मागण्यांसाठी नागपूर येथे आंदोलनात सहभागी व्हा-नारायण जाधव

वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील परिट धोबी समाजाच्या ज्वलंत मागण्या तात्काळ पूर्ण करण्यासाठी सरकारविरोधात नागपूर येथे अखिल भारतीय परिट धोबी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बालाजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली धरणे आंदोलनास दि.८ डिसेंबर सोमवार रोजी सुरुवात झाली असून राज्यातील परिट धोबी बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होवून लढा यशस्वी करावा असे आवाहन वडवणी परीट धोबी समाजाचे युवा पत्रकार नारायण जाधव यांच्या वतीने करण्यात आले आहे.



गेल्या अनेक वर्षापासून महाराष्ट्रातील परीट धोबी समाज, महाराष्ट्र शासनाकडे, समाजाच्या मागण्यांसाठी सातत्याने पाठपुरावा करीत आहे. परंतु सरकारकडून दुर्लक्ष होत असल्याने सरकारच्या विरोधात बेमुदत साखळी धरणे प्रदर्शन नागपूर येथे करणार आहेत परीट धोबी समाजाच्या मागण्या खालील प्रमाणे आहेत. महाराष्ट्रातील परीट धोबी समाजाला अनुसूचित ◀◀ पान ३ वर

# ओटीपी म्हणजे तिजोरीची चावी कोणालाही शेअर करू नका-अमित धुळे

## व्यापारी वर्गासाठी स्वतंत्र काउंटर सुरू

किल्ले धारूर । प्रतिनिधी

नागरिकांना कायदेशीर माहिती नाही कर्ज कसे घ्यावे आणि परतफेड करून पुन्हा कर्ज नव्याने कसे घ्यावे यामुळे नवीन उद्योजक तयार होत नसून व्यापाऱ्यांची ग्रोथ होत नाही. यामुळे एसबीआय बँकेने नवीन प्री एप्रो व्यवसाय लोन ही योजना आणली असून यामध्ये कमी कागदपत्र घेऊन चांगल्या ग्राहकाला कमी व्याजदरात तात्काळ कर्ज दिले जात आहे यासाठी ग्राहकांनी जीएसटी व रिटर्न वेळेची वेळी भरणे गरजेचे आहे तसेच आता बँकिंग व्यवहार हे सर्व ऑनलाईन झालेले असल्याने आपल्याला येणारा ओटीपी हा आपल्या तिजोरीची चावी आहे त्यामुळे तो इतरांशी शेअर करू नका असे प्रतिपादन स्टेट बँक ऑफ इंडिया रिजनल मॅनेजर अमित धुळे यांनी केले.



येथील स्टेट बँक ऑफ इंडिया तेलगाव रोड किल्ले धारूर यांच्या वतीने व्यवसायिकांसाठी हक्काचे काउंटर उभारण्यात आले असून या काउंटरच्या माध्यमातून करंट व सीसी अकाउंट उघडण्यास मदत होणार आहे या काउंटरचे उद्घाटन स्टेट बँक ऑफ इंडिया बीड ◀◀ पान ३ वर

# स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त गोशाळेला चारा व पालावरील कुटुंबांना ब्लँकेट वाटप

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी माजलगावच्या वतीने दिं १२ डिसेंबर शुक्रवार रोजी सकाळी १०:०० वाजता लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंती निमित्त पालावर राहणाऱ्या ५१ कुटुंबांना ब्लँकेट वाटप करून देवखेडा येथील गोशाळेला चाऱ्यासाठी आर्थिक देणगी देऊन गोपीनाथराव मुंडे यांची जयंती साजरी करण्यात आली.



लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत सर्वसामान्य गरजू गरीब वंचित कुटुंबांना न्याय देण्याचा प्रयत्न करत त्यांची अविरत सेवा करण्यासाठी प्रयत्न केला आणि त्यामुळे त्यांचे अभिप्रेत असे अविरत सेवाकार्य लक्षात घेऊन त्यांच्या विचारावर चालत माजलगाव भाजपाच्या वतीने त्यांची जयंती सामाजिक उपक्रमांनी साजरी व्हायला हवी या अनुषंगाने सध्या कडाक्याची थंडी चालू असल्यामुळे पालावरील गरजू गरीब ५१ कुटुंबांना ब्लँकेट वाटप केले व देवखेडा येथील गोशाळेला चाऱ्यासाठी आर्थिक देणगी देऊन गोपीनाथ मुंडे यांची जयंती साजरा करण्यात आली आणि येणाऱ्या काळात देखील माजलगाव भाजपाच्यावतीने सर्वसामान्य गरजू गरीब व्यक्तींसाठी निश्चितच न्याय देण्याचा प्रयत्न करत त्यांची सेवा करण्याचा प्रयत्न करू असा संकल्प या ठिकाणी सर्वांनी केला.या कार्यक्रमाच्या प्रसंगी भाजपाचे ज्येष्ठ नेते डॉक्टर प्रकाश आनंदगावकर,राज्य परिषद सदस्य अरुण राऊत, ज्ञानेश्वर मेंडके, माजी नगराध्यक्ष डॉ अशोक तिडके, माजलगाव ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# भवानीनगरमध्ये तणाव!

## ‘छत्रपती’ कारखान्यासमोरून पालखी मार्ग नेण्यास सक्त विरोध

**भवानीनगर । प्रतिनिधी**

श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्यासमोरील रस्ता व पुलाचे काम सणसरपर्यंत श्री संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाचे काम सध्या चालू आहे. ते काम करू दिले जाणार नसल्याचा निर्णय ग्रामस्थ, पदाधिकारी यांनी एकमताने घेऊन हा रस्ता कारखान्याच्या बाजूने (बायपास) करण्यात यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. सणसर येथे ग्रामपंचायत कार्यालयामध्ये बैठक घेण्यात आली. त्यावेळी हा निर्णय घेण्यात आला.यावेळी श्री संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाचे प्रकल्प अधिकारी घोडके, ठेकेदार चव्हाण, श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक, सणसरचे सरपंच यशवंत पाटील, माजी सरपंच पार्थ निंबाळकर, अभयसिंह निंबाळकर, ड. विलास खटके, शिवाजी काळे,



करण निंबाळकर, किरण गायकवाड, विशाल निंबाळकर, पिंटू गुप्ते, शब्बीर काझी, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीमध्ये श्री संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाचे काम बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. जोपर्यंत या भागातून बायपास रस्ता होत नाही.

तोपर्यंत या ठिकाणी काम करू दिले जाणार नाही, असा इशारा यावेळी उपस्थित सर्वांच्या वतीने देण्यात आला.जाचक म्हणाले, इंदापूर व बारामती तालुक्यातील ५३ गावांचे क्षेत्र असलेला श्री छत्रपती कारखाना हा इंदापूर व बारामती तालुक्याच्या सीमेवर आहे. श्री छत्रपती कारखान्याचा अध्यक्ष मी असून जरी मी सणसर गावचा रहिवासी नसलो तरी साखर कारखान्याचा अध्यक्ष नात्याने ५३ गावचे पालकत्व माझ्याकडे आहे, अशी आक्रमक भूमिका त्यांनी यावेळी घेतली. यावेळी रस्त्यालगत बंदिस्त गटार लाईन, वॉटर सप्लाय, आरोग्यासाठी सुविधा असतील ते कामे करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तुकाराम महाराज पालखी महामार्ग हा श्री छत्रपती कारखान्यासमोरून न जाता हा रस्ता छत्रपती कारखान्याबाहेरून बायपास पद्धतीने करावा, यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या मार्गदर्शनाखाली पृथ्वीराज जाचक, पालखी महामार्गाचे प्रकल्प अधिकारी घोडके, रस्त्याचे ठेकेदार चव्हाण यांची एकत्र बैठक घेऊन जो काही निर्णय होईल, त्या पद्धतीने कामाला सुरुवात करण्याची परवानगी दिली जाणार आहे. पालखी मार्गाचे जोपर्यंत बायपास पद्धतीने रस्त्याचा प्रस्ताव मंजूर होत नाही. तोपर्यंत काम करू नये अशी आक्रमक भूमिका घेतली. कारखान्या समोरील रस्ता व पुलाचे काम सणसरपर्यंत होऊ देणार नाही. जोपर्यंत या भागातून बायपास रस्ता मंजूर होत नाही. तोपर्यंत काम बंद ठेवण्याचा निर्णय घेऊन याबाबतीत सर्व पदाधिकारी व ग्रामस्थ तीव्र आंदोलन करण्यास देखील तयार आहेत.

# सायबर चोरट्याकडून सिरम इन्स्टिट्यूटच्या अधिकाऱ्याची २३ लाखांची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करून मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया येथे डेप्युटी मॅनेजरची (उपव्यवस्थापक) २३ लाख १४ हजारांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.




याप्रकरणी आकाश दिनेश पवार (वय ३६) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार सायबर चोरट्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पवार यांना २४ नोव्हेंबर २०२४ रोजी इंस्टाग्रामवर शेअर मार्केटशी संबंधित जाहिरात पाहिली. त्यांनी जाहिरातीत दिलेल्या लिंकवर क्लिक करताच त्यांना एका व्हॉट्सप ग्रुपमध्ये ड झाले. रंजीव मान आणि ऐश्वर्या राजपूत या नावांचा वापर करणाऱ्या व्यक्तींनी स्वतःला ग्रुपचे ॲडमिन असल्याचे सांगत शेअर ट्रेडिंग व आयपीओच्या माध्यमातून नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून मोबाईल ॲप डाउनलोड करण्यास सांगितले.

यानंतर विविध बँक खात्यांमध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली रक्कम पाठविण्यास सांगण्यात आले. २ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२४ या दरम्यान पवारने २३ लाख १४ हजार १० रुपये विविध बॅक खात्यांमध्ये पाठवले. ॲपमध्ये त्यांच्या गुंतवणुकीवर ८३ लाखांचा नफा झाल्याचे दाखवण्यात आले. फिर्यादीने पैसे काढायचे असल्याचे सांगितल्यावर नफ्यावर आधी १२ टक्के कर भरावा लागेल असे सायबर चोरट्यांकडून सांगण्यात आले. हा कर नफ्यातून वजा करा असे सांगितले असता आधी कराची रक्कम भरल्याशिवाय पैसे मिळणार नसल्याचे सायबर चोरट्यांनी सांगितले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर पवार यांनी फिर्याद दिली.याप्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरिक्षक (गुन्हे) जगदाळे करत आहेत.

# शिंदवणे घाटात रात्रीचा थरार! रॉंग साईडने आलेल्या टेम्पोने दुचाकीला १०० मीटर फरफटत नेले

**उरुळी कांचन । प्रतिनिधी**

जेजुरी-उरुळी कांचन रस्त्यावरील शिंदवणे (ता. हवेली) येथील हद्दीत टेम्पोने समोरून येणाऱ्या दुचाकीला जोरदार दिलेल्या धडकेत दुचाकीवरील दोघेजण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. वाकवस्ती परिसरात गुरुवारी (दि.११) रात्री साडे दहा वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. अपघातानंतर टेम्पोचालक वाहन सोडून फरार झाला आहे.

त्याचे नाव अद्याप समजू शकले नाही. त्याच्यावर उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.प्रणव संभाजी ढमढेरे (वय २१), व सार्थक विजय ढमढेरे (वय २०, दोघेही रा. तळेगाव ढमढेरे ता. शिरुर), असे अपघातात जखमी झालेल्या दोघांची नावे आहेत. याप्रकरणी दीपक दत्तात्रय ढमढेरे (वय २०, रा. तळेगाव ढमढेरे) यांनी फिर्याद दिली आहे.

गुरुवारी फिर्यादी व त्यांचे चुलत भाऊ असे तिघेजण देवदर्शनासाठी दुचाकीवरून गेले होते. संध्याकाळी तळेगाव ढमढेरे येथे दुचाकीवरून माघारी घरी निघाले होते. शिंदवणे ग्रामपंचायत हद्दीतील वाकवस्ती परिसरात आले असता उरुळी कांचनवरून जेजुरी बाजूकडे भरधाव वेगाने एक टेम्पो निघाला होता. टेम्पो चालकाने भरधाव वेगात रॉंग साईडला येत दुचाकीवरील तिघांना जोरदार धडक दिली. यावेळी दुचाकी ही टेम्पोच्या समोर पडल्याने ट्रकचालक न थांबता चालकाने १०० मीटरपर्यंत दुचाकी फरफटत नेली. यावेळी दुचाकीवरील प्रणव ढमढेरे व सार्थक ढमढेरे हे गंभीर जखमी झाले. त्यांच्या पाठीमागे बसलेला आणखी एकजण किरकोळ जखमी झाला. दरम्यान, हवालदार उद्धव गायकवाड यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. रुग्णवाहिकेचे वैभव कदम व कस्तुरी रुग्णवाहिकेचे संतोष झोंबाडे यांनी तात्काळ जखमी झालेल्या दोघांना दोन्ही रुग्णवाहिकेतून उरुळी कांचन येथील सिद्धिविनायक हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले. सिद्धिविनायक रुग्णालयात प्राथमिक उपचार झाल्यानंतर पुढील उपचारासाठी पुण्यातील एका बड्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. तपास पोलीस हवालदार उद्धव गायकवाड करीत आहेत.

# पुण्यात दिवसा घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांना अटक, समर्थ पोलिसांची कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील समर्थ पोलीस स्टेशनच्या हद्दीत दिवसा घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांना पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईत चोरीस गेलेले सोने-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण सुमारे १ लाख ९९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ८ डिसेंबर २०२५ रोजी फिर्यादी यांच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला आणि मौल्यवान दागिने तसेच रोख रक्कम चोरून नेली होती. याप्रकरणी समर्थ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता.




तपासादरम्यान पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे दोन आरोपींना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. आरोपींकडून चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, यापूर्वीही त्यांनी पुणे आणि परिसरात घरफोडीचे गुन्हे केल्याची माहिती समोर आली आहे.

# पुस्तक महोत्सवात रविवार ठरणार पुस्तकवार!

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे पुस्तक महोत्सवाचे शनिवारी जल्लोषात उद्घाटन झाल्यानंतर आता वाचनप्रेमींना विविध विषयांवरील हजारो पुस्तकांचा खजिना खुला झाला.

या महोत्सवात ऐतिहासिक, शैक्षणिक, वैज्ञानिक, चरित्र, प्रवासवर्णन, संशोधन, आरोग्य, राजकारण अशा विविध विषयांवर हजारो पुस्तके उपलब्ध आहे. नागरिकांनी १४ डिसेंबरला रविवारच्या सुटीचा लाभ घेत पुस्तक खरेदी करण्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी शनिवारी केले. राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या (एनबीटी) वतीने फर्ग्युसन कॉलेजच्या मैदानावर पुणे पुस्तक महोत्सवाची दमदार सुरुवात झाली. महोत्सवात ८० पेक्षा अधिक नामांकित प्रकाशक सहभागी झाले असून, सर्व भारतीय भाषांमधील पुस्तके उपलब्ध आहेत. या महोत्सवात करिअर, सरकारी योजना, स्पर्धा परीक्षा, प्रवेश परीक्षा अशा विविध विषयांवर नवी पुस्तके आहेत. या महोत्सवात पुस्तकांच्या ८०० दालनांसोबतच सांस्कृतिक कार्यक्रम; तसेच पुणे लिटरेचर फेस्टिवल होत आहे.




तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी चिल्ड्रेन कॉर्नर आहे. या अंतर्गत मुलांसाठी विविध स्पर्धा, उपक्रमांचे आणि कार्यशाळांचे आयोजन केले आहे. पुस्तक महोत्सवात सुमारे ४० दालनांचे मिळून भव्य फूडकोर्ट निर्माण केले आहे. रविवारी शाळा- कॉलेज तसेच विविध सरकारी आणि खासगी कार्यालयांना सुटी असते. त्यामुळे अधिकाधिक पुणेकरांनी आपल्या पाल्यांना घेऊन त्यांना पुणे पुस्तक महोत्सवाची रंजक सफर घडवावी, असे आवाहन पांडे यांनी केले. विद्यार्थ्यांना आनंदमठ पुस्तक आणि खाऊ

पुणे पुस्तक महोत्सवात विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक पुस्तके असून, एनबीटीने प्रकाशित केलेली पुस्तके आहेत. ही पुस्तके सवलतीच्या दरात खरेदी करता येतील. त्याचप्रमाणे महोत्सवाला भेट देणाऱ्या सुमारे एक लाख विद्यार्थ्यांना आनंदमठ हे पुस्तक भेट म्हणून देण्यात येणार आहे. तसेच या पुस्तकांसोबत विद्यार्थ्यांना खाऊही देण्यात येईल, अशी माहिती पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी दिली.

# कृत्रिम बुद्धिमत्ता युगातील मनुष्यबळ: विश्वकर्मा विद्यापीठात पूर्व-शिखर परिषदेचे आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (-ख) वेगाने बदलणाऱ्या युगात मनुष्यबळ विकासाची दिशा निश्चित करण्यासाठी शहरातील अग्रगण्य विश्वकर्मा विद्यापीठ (तण) आणि अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या (-खउढए) वतीने महत्त्वपूर्ण पूर्व-शिखर परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ‘कृत्रिम बुद्धिमत्ता युगातील मनुष्यबळ’ या विषयावर होणारी ही परिषद सोमवार, १५ डिसेंबर रोजी हयात इस्ता, पुणे येथे सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत पार पडणार आहे.


या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमासाठी केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय आणि इंडिया एआय यांचा सक्रिय सहभाग लाभला आहे. तसेच, कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (उखख) आणि जागतिक आयटी क्षेत्रातील दिग्गज कंपनी इन्फोसिस यांनीही सहकार्य केले आहे. एआयमुळे शिक्षण व्यवस्था, आस्थापने आणि प्रशासकीय संरचनेत होत असलेल्या मूलभूत बदलांच्या पार्श्वभूमीवर, भविष्यासाठी सज्ज कौशल्ये आणि लवचिक शिक्षण पद्धती विकसित करण्याच्या गरजेवर परिषदेत जोर दिला जाणार आहे. उच्च शिक्षण संस्था, धोरणकर्ते आणि उद्योगजगताने एकत्र येऊन मनुष्यबळ विकासात कशी गुंतवणूक करावी, यावर चर्चा करण्यासाठी ही एआय प्री-समिट एक महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध करून देणार आहे. या परिषदेत शिक्षणतज्ज्ञ, धोरणकर्ते, उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ, तंत्रज्ञान व्यावसायिक, स्टार्ट-अप्स आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. या परिषदेमधून मुख्य भाषणे, तज्ज्ञांचे सत्र आणि विषयक चर्चांच्या माध्यमातून मानवी बुद्धिमत्ता आणि नैतिक निर्णयक्षमतेने मशीन इंटेलिजन्सला कसे पूरक ठरावे, याचा वेध घेण्यात येईल. जबाबदार एआय, कामगार पुनःकौशल्य (री-स्किलिंग), डिजिटल युगातील नेतृत्व आणि एआयचे सामाजिक परिणाम हे विषय चर्चेचे केंद्रबिंदू असतील. विश्वकर्मा विद्यापीठाचा हा उपक्रम राष्ट्रीय प्राधान्यक्रम आणि सर्वसमावेशक विकास उद्दिष्टांशी सुसंगत असून, एआय युगात भारताच्या मनुष्यबळाच्या बळकटीसाठी धोरणात्मक सूचनांबरोबरच व्यावहारिक उपाययोजना सुचवण्याचा प्रयत्न या परिषदेद्वारे केला जाईल. देशभरातून मोठ्या प्रमाणावर अपेक्षित असलेल्या या सहभागामुळे शिक्षण, नवकल्पना आणि वैचारिक नेतृत्वाचे केंद्र म्हणून पुण्याची ओळख अधिक दृढ होणार आहे.

# डॉ. पतंगराव कदम यांचे योगदान अनमोल-डॉ.सदानंद मोरे

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे शिल्प अनेक नेत्यांनी घडवले असून, त्यात डॉ. पतंगराव कदम यांचे नाव महत्त्वाचे आहे. त्यांचे शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान अनमोल आहे, असे मत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात डॉ. मोरे यांच्या हस्ते ‘ महाराष्ट्राचे शिल्पकार : डॉ पतंगराव कदम’ आणि ‘ ज्ञानयात्रेचा पथिक ‘ या डॉ. महादेव सगरे लिखित दोन ग्रंथाचे प्रकाशन झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, प्राचार्य डॉ.




महादेव सगरे, सहकार्यवाह डॉ. के.डी. जाधव, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा.मिलिंद जोशी, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा.संजय ठिगळे, गोल्डनपेज पब्लिकेशनचे संपादक प्रदीप खेतमर उपस्थित होते.

डॉ. मोरे पुढे म्हणाले, लोकांना नेता माहिती असतो पण त्याचे पूर्ण जीवनचरित्र माहिती नसते. प्राचार्य डॉ. महादेव सगरे यांनी लिहिलेल्या आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेल्या या ग्रंथातून डॉ.पतंगराव कदम यांचा जीवनपट उलगडला असून त्यांच्या जीवनावर टाकलेला प्रकाश पुढील पिढीस प्रेरणादायी ठरणारा आहे.

प्रा. जोशी म्हणाले, डॉ पतंगराव कदम यांनी केवळ संस्था उभ्या केल्या नाहीत तर माणसे उभी केली. त्यांनी भारती विद्यापीठ आणि समाज यांच्यात कायम संवादाचे पूल उभे राहतील असे प्रयत्न केले. भारती विद्यापीठाने विविध साहित्यिक आणि सांस्कृतिक संस्थांना जी भरभरून मदत केली त्यामुळे अनेक महत्त्वाचे प्रकल्प पूर्ण झाले. डॉ. शिवाजीराव कदम म्हणाले, डॉ.पतंगराव कदम यांनी सामान्य माणसांशी असलेली आपली नाळ कधीही तुटू दिली नाही. परिस्थितीची झळ सोसणाऱ्या अनेक गरजू आणि गरीब विद्यार्थ्यांचे जीवनशिल्प त्यांनी भारती विद्यापीठाच्या माध्यमातून घडविले. जे काम करायचे ते उत्तमच यासाठी ते कायम आग्रही असायचे. प्रास्ताविक प्रकाशक प्रदीप खेतमर यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ.आप्पासाहेब पाटील यांनी केले.

# आळंदीच्या कचरा डेपोला पुन्हा आग!



**आळंदी । प्रतिनिधी**

आळंदीमधील कचरा डेपोला पुन्हा आग लागल्याने परिसरात मोठ्या प्रमाणात धुराचे साम्राज्य दिसत आहे. अश्या अवस्थेतच मोकाट जनावरे कचरा खात असल्याचे दिसून येत आहे. खत निर्मिती साठी असलेल्या ठिकाणी प्लास्टिक गोण्या व इतर कचरा टाकला जात आहे.डेपोच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ तसेच मध्यभाग व इतर ठिकाणचा कचरा जळालेल्या अवस्थेत आहे.

गेल्या काही महिन्यांपासून डेपो दुरावस्थेत असून त्याकडे दुर्लक्ष असल्याने कचरा डेपोस आग लागली आहे. अग्निशमन दलाचे आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न चालू आहेत.असे स्थानिक नागरिकाने सांगितले.कचरा डेपोचे आग सत्र सुरूच असून या वर्षी एप्रिल ते डिसेंबर पर्यंत डेपोस अनेक वेळा आग लागली. नगरपरिषदेने येथे पुन्हा आग लागू नये, तेथील हालचाली व देखरेखी साठी सीसीटिव्ही कॅमेरे बसवणे आवश्यक आहे. २४ तास सुरक्षा रक्षक नेमणे, कचरा डेपोमध्ये येणाऱ्या जाणाऱ्या व्यक्तींची माहिती ठेवणे. मोकाट जनावरे आत जाऊ नये यासाठी उपाय योजना करणे, यासह विविध मागण्या नागरिकांनी केल्या आहेत


# पिंपरी चिंचवड महापालिकेची रात्रीची स्वच्छता मोहीम ठरतेय प्रभावी!

## वाहतुकीला अडथळा न आणता शहरातील प्रमुख रस्त्यांवर रात्री उशिरापर्यंत स्वच्छतेची कामे

**पिंपरी । प्रतिनिधी**

शहर अधिक स्वच्छ, आकर्षक आणि नीटनेटके दिसावे, यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून राबवण्यात येत असलेली रात्रीची स्वच्छता मोहीम प्रभावी ठरत आहे. दिवसा रस्त्यावरील वाहतूक आणि नागरिकांची गर्दी असते. त्यामुळे शहरातील प्रमुख रस्त्यांवर वाहतुकीला अडथळा होऊ नये, नागरिकांना त्रास होऊ नये, तसेच स्वच्छता अधिक कार्यक्षमतेने व्हावी, यासाठी महापालिकेकडून रात्री उशिरापर्यंत स्वच्छतेची कामे केली जात आहेत.

महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, सहाय्यक आयुक्त अमित पंडित यांच्या अधिपत्याखाली सुरू असणाऱ्या या मोहिमेत कचरा संकलन, रस्त्यांची यांत्रिक स्वच्छता,



कडेकपारीतील घाण काढणे, धूळ-माती साफ करणे, यांसारखी विविध कामे केली जात आहेत. नव्या अत्याधुनिक वाहनांचा वापर आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची मदत यामुळे या मोहिमेचा वेग वाढला असून परिणामही स्पष्ट दिसत आहेत.

या उपक्रमांतर्गत दररोज साधारण २५ टन कचरा संकलित केला जात असून अनेक मुख्य रस्ते, व्यावसायिक भाग आणि महत्त्वाच्या चौकांमध्ये मोठ्या प्रमाणात स्वच्छतेत सुधारणा दिसून येत आहे. रात्रीच्या वेळी रहदारी कमी असल्याने यांत्रिक झाडूने व इतर यंत्रणा अधिक प्रभावीपणे काम करू शकतात. नवीन उपकरणे, तैनात कर्मचारी आणि वेळेचे सुयोग्य नियोजन यामुळे ही मोहीम यशस्वी ठरत आहे.

दरम्यान, स्वच्छता ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी असून, आपला कचरा योग्य विलगीकरण करून महापालिकेच्या घंटागाडीला द्यावा तसेच शहर स्वच्छतेसाठी महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी केले आहे.

# वेताळवाडीत रोटरी क्लब ऑफ पुणे नांदेड सिटीचा ‘पाणी सुरक्षा’ उपक्रम



**पुरंदर । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील वेताळवाडी गावात पाणीटंचाई आणि पाण्याच्या गुणवत्तेच्या दीर्घकालीन समस्यांवर मात करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ पुणे नांदेड सिटीच्या वतीने महत्त्वपूर्ण सामुदायिक सेवा प्रकल्प राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत गावातील सार्वजनिक पाण्याच्या विहिरीचे खोलीकरण तसेच संपूर्ण स्वच्छता करण्यात आली असून, त्यामुळे ग्रामस्थांना स्वच्छ व विश्वसनीय पाणीपुरवठा उपलब्ध होणार आहे.

या प्रकल्पासाठी रोटरी क्लबचे सदस्य आणि स्थानिक ग्रामस्थ यांनी एकत्र येत प्रत्यक्ष कामात सहभाग घेतला. या सहकार्यामुळे प्रकल्पाची यशस्वी पूर्तता तर झालीच, शिवाय गावकऱ्यांमध्ये सामूहिक सहभागाची भावना अधिक दृढ झाली. सुधारित पाणी उपलब्धतेमुळे घरगुती वापरासह शेती व पशुधनासाठीही स्वच्छ पाणी मिळणार आहे. या उपक्रमाच्या लोकार्पण कार्यक्रमास रोटेरियन संतोष सुरपुरे, अतुल कारले, प्रा. अमरसिंह कणसे पाटील, प्रदीप कुलकर्णी यांच्यासह रोटरी क्लबचे इतर सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. रोटरी इंटरनॅशनलच्या शाश्वत पाणी व स्वच्छता उपाययोजनांच्या ध्येयाशी सुसंगत असा हा प्रकल्प असून, वंचित ग्रामीण भागात सकारात्मक बदल घडवून आणण्याच्या रोटरी क्लब ऑफ पुणे नांदेड सिटीच्या वचनबद्धतेचे हे उत्तम उदाहरण असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.